## आज होणार नमाज पठण

**रायगड** मुस्लीम समाजाचा पवित्र समजला जाणारा ई ए मिलाद हा सण रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी साजरा केला जाणार आहे. १७१ ठिकाणी नमाज पठण केले जाणार असून, या सणानिमित्त २२ ठिकाणी मिरवणुका काढल्या जाणार आहेत. कोणाताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. रसायनी, खोपोली, अलिबाग, वडखळ, पेण, नेरळ येथील दहा ठिकाणी ३०० ते दीड हजार मुस्लीम बांधव नमाज पठण करणार आहेत. श्रीवर्धन, खालापूर, माथेरान, महाड शहर, नागोठणे, कर्जत, महाड तालुका, नेरळ, खोपोली, गोरेगाव, पेण, माणगाव, पाली या परिसरात मिरवणुका काढण्यात येणार आहेत.

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ५ सप्टेंबर २०२५

किंमत ५ ₹

## सरकारविरुद्ध कोर्टात जाणार

**मुंबई :** दुसरीकडे या जीआरवरून ओबीसी नेत्यांमध्येही दुफळी निर्माण झाली आहे. या जीआरमुळे ओबीसींचे काडीचेही नुकसान नाही, असे ओबीसी महासंघाचे नेते बबनराव तायवाडे म्हणाले असतानाच ज्येष्ठ ओबीसी नेते असलेले अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ मात्र जीआरला कोर्टात खेचण्याच्या तयारीत आहेत. राज्य सरकारने काढलेला जीआर हा ओबीसींचे आरक्षण संपविणार आहे. त्यामुळे या जीआरविरोधात रस्त्यावर आणि न्यायालयीन लढाई लढण्याचा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला. हा जीआर काढण्याचा अधिकार शासनाला नाही. उपसमितीने तटस्थ राहून निर्णय घ्यायला हवा होता, असे म्हटले आहे.

# शिक्षकांचा 'आदर्श' रखडला

प्रमोद जाधव

। रायगड ।

**शिक्षक दिनाच्या निमित्ताने कर्तृत्ववान शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. परंतु, गेल्या अनेक वर्षांच्या या परंपरेला प्रशासकीय राजवटीत ब्रेक लागला आहे. तीन वर्षांपासून जिल्हा परिषदेवर प्रशासनाद्वारे कारभार सुरू आहे. प्रशासनामार्फत फक्त पुरस्कार जाहीर केले जात आहेत. मात्र, पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम घेतला जात नाही, अशी परिस्थिती आहे.**

रायगड जिल्ह्यात तीन हजारांहून अधिक शाळा असून, त्यात दोन हजार ५०१ जिल्हा परिषद शाळा आहेत. या शाळांमध्ये पाच हजार ८८८ शिक्षक असून, ८७ हजार ९२ विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत आहे. या विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम शिक्षक करतात. शासनाच्या

- **तीन वर्षांपासून आदर्श पुरस्कार वितरण नाही**
- **प्रशासकीय राजवटीत अनेक वर्षांची परंपरा पुसण्याची भीती**

वेगवेगळ्या शैक्षणिक व अशैक्षणिक योजनांचे काम शिक्षक करतात. डिजिटल शिक्षण देण्याबरोबरच खेळता खेळता शिक्षण यावरही अनेक शिक्षक भर देत आहेत.

आदर्शवत काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श पुरस्कार देऊन



### आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील मनोहर पाटील यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, पेण तालुका किशोर पाटील, पनवेल तालुका योगिनी वैदू, कर्जत संज्योती कांबरी, खालापूर तालुका किर्ती धारणे, उरण तालुका अजित जोशी, सुधागड तालुका वृषाली गुरव, रोहा तालुका प्रसाद साळवी, महाड तालुका वसंत साळुंखे, श्रीवर्धन तालुका सीमा चव्हाण व नारायण खोपटकर, म्हसळा तालुका शशिकांत भिंगारदेव, पोलादपूर तालुका विजय पवार, माणगाव सुजाता मालोरे व परेश अंधेरे, तळा तालुका उल्का मोडकर, मुरुड तालुका हेमकांत गोयजी यांचा समावेश आहे. शिक्षण विभागाने हा पुरस्कार वितरण सोहळा लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी होत आहे.**

जिल्हा परिषदेमार्फत गौरव केला जातो. या पुरस्कारामुळे शिक्षकांना एक प्रेरणा मिळते. हा पुरस्कार म्हणजे आदर्शवत शिक्षकांसाठी नवी ऊर्जा देणारे आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून पाच सप्टेंबरला दरवर्षी साजरा केला जातो. या दिनानिमित्त जिल्ह्यातील आदर्शवत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केला जातो.

> **आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम नसल्याने यादी जाहीर केली नाही. परंतु, यादी तयार आहे. कार्यक्रम घेतल्यास आदर्श शिक्षकांना पुरस्कार वितरण केले जाईल.**
>
> **- महारुद्र नाले, शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग, रायगड**

सन्मानपत्र देऊन हा गौरव केला जातो. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या या पुरस्काराचे महत्त्व वाढले आहे. रायगड जिल्हा परिषदेमार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाची ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. परंतु, या पुरस्कार वितरणाला ब्रेक लागला आहे.

राजकीय राजवट संपून जिल्हा परिषदेवर २१ मार्च २०२२ पासून प्रशासकीय राजवट सुरु आहे. प्रशासनामार्फत जिल्हा परिषदेचा कारभार चालविला जात आहे. तरीदेखील गेल्या तीन वर्षांपासून आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम प्रशासन राबवू शकले नाही. पाच सप्टेंबरपूर्वी आदर्श शिक्षकांची यादी जाहीर केली जाते. परंतु, त्यांचा प्रत्यक्ष सन्मान करण्यास जिल्हा परिषद प्रशासन उदासीन ठरल्याची चर्चा जोरात सुरु आहे. मागील तीन वर्षांपासून ९० हून अधिक शिक्षकांना अद्याप पुरस्कार मिळाले नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या परंपरेला ब्रेक लागल्याचे चित्र आहे. यावर्षीदेखील प्राथमिक विभागाच्या आदर्श शिक्षकांची यादी गुरुवारी (दि.४) जाहीर करण्यात आली. याबाबत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

## गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासात विघ्न



। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।

- **मुंबई-गोवा महामार्गावर रात्री वाहतूक कोंडीचा सामना**

पाच दिवसांच्या गणरायाला निरोप दिल्यानंतर कोकणकर पुन्हा परतीच्या मार्गावर निघाले होते. मात्र, त्यांना मुंबई-गोवा महामार्गावर रात्री वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. त्यामुळे त्यांचा संताप अनावर झाला.

मुंबई-गोवा महामार्गावर रात्री रोहा तालुक्यातील खांब गावाजवळ, पेण तालुक्यातील जिते गाव आणि पनवेल तालुक्यातील पळस्पे येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. मुंबई-गोवा महामार्गावरील या ठिकाणी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. तसेच रस्त्याचे काम सुरू आहे. दुभाजक व गतिरोधकदेखील आहेत. त्यामुळे वाहतुकीला आणखी अडथळा येतो. गणराय आणि गौरी विसर्जन केल्यानंतर सायंकाळी कोकणकर मुंबईकडे परतीच्या मार्गाला निघाले होते. मात्र, अचानक महामार्गावर वाहने वाढल्यामुळेदेखील त्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. काही जणांनी पाली-खोपोली मार्गावरून जाणे पसंत केले.

### वेधक

### हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांची फसवणूक

**उरण :** जेएनपीए बंदरासाठी आपली भूमी गमावून संपूर्णपणे भूमीहीन झालेल्या हनुमान कोळीवाड्याच्या ग्रामस्थांना पुन्हा एकदा केंद्र सरकारने फसवले आहे. पुनर्वसनासाठी मागितलेली जमीन नाकारून या कष्टकरी, मच्छिमार समाजाला क्लस्टरच्या काँक्रिटच्या तुरुंगात कोंबून टाकण्याचे फर्मान केंद्रीय बंदरे, शिपिंग व जलवाहतूक मंत्रालयाने जेएनपीए प्रशासनाला बजावले आहे. ग्रामस्थांचा ४० वर्षांचा संघर्ष, ५५० बैठका, मोर्चे, आंदोलनं आणि समुद्री चॅनल रोखण्याइतकी तुफान लढाई झाल्यानंतरही •> पान २ वर

## पर्यायी रस्त्याचा अभाव, थेट पोलिसी दबाव

### एमएसआयडीसीच्या कामावर शेतकऱ्यांचा संताप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

एमएसआयडीसीच्या कार्ले खिंड-थळ-वायशेत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामावरून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. एमएसआयडीसी (महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ) कडून रस्त्याचे काम सुरु असताना, शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग किंवा रस्ता ठेवण्यात आलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांची दररोजची शेती, घरकुल, जनावरांचे व्यवस्थापन या सर्व आधारभूत आर्थिक व सामाजिक प्रश्नांवर मोठे संकट निर्माण झाले आहे. अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना शेतकऱ्यांचे निवेदन ईमेलद्वारे पाठवून •> पान २ वर



### शेतकरी आक्रमक, संघर्षाची तयारी

शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर त्वरित पर्यायी मार्ग दिला गेला नाही, तसेच पोलिसांचा दबाव थांबवला नाही, तर पुढे शासन, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, सार्वजनिक बांधकाम खाते व सर्व संबंधित यंत्रणांच्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. या प्रकरणाची दखल न घेतल्यास, न्यायालयीन प्रक्रियेकडेही वळण्याचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक पातळीवर ग्रामसभा बोलवण्याची, सर्व शेतकऱ्यांची एकजूट होत आंदोलनासाठी मैदानात उतरण्याची जोरदार मागणी सुरू झाली आहे.

## जामिनावर सुटलेल्या आरोपीचा पोलिसांवर कुऱ्हाडीने हल्ला

- **पुतणीला ठार मारण्याचा प्रयत्न**
- **आरोपीला ठोकल्या बेड्या**

। पनवेल । प्रतिनिधी ।

आपल्या १६ वर्षीय पुतणीला जबरदस्तीने स्वतःच्या कब्जात ठेवून तिच्या गळ्याला कोयता लावून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, यावेळी त्याठिकाणी पोलीस पथक पोहोचले असता त्यांच्यावर कुऱ्हाड व कोयत्याने हल्ला करून दोघांना जखमी करणाऱ्या, एका खून प्रकरणात जामिनावर सुटलेल्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.



आरोपी सोबन बाबुलाल महातो (३५) रा. मंगला निवासी, पनवेल याने बुधवारी रात्री ११.३० च्या दरम्यान त्याच्या बिल्डिंगमधील दुसऱ्या रूमचे लॉक तोडून कुऱ्हाड व कोयता अशा घातक शस्त्रांसह जबरदस्तीने रुममध्ये प्रवेश करून ही पूर्ण बिल्डिंग माझी आहे, मला जर कोणी अडवले तर सर्वांना ठार मारून टाकेन, असे जोरजोरात आरडाओरडा केला. याबाबतची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्यांचे पथक त्याला ताब्यात घेण्यासाठी घटनास्थळी गेले असता त्याने या पथकावर कुऱ्हाड व कोयत्याने हल्ला केला. या हल्ल्यात पोना सम्राट डाकी, पोना रवींद्र पारधी यांना गंभीर दुखापत केली.

यावेळी वपोनि नितीन ठाकरे, पोनी शाकिर पटेल व पथकाने त्यांच्यासोबत •> पान २ वर

### पश्चिम बंगालच्या विधानसभेत राडा

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभेत गुरूवारी प्रचंड गोंधळ उडाला. सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि विरोधातील भाजप आमदारांमध्ये जोरदार हाणामारी झाली. यादरम्यान भाजपचे मुख्य प्रतोद आमदार शंकर घोष यांची प्रकृती बिघडल्याने, त्यांना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आलं. प्राप्त माहितीनुसार, बंगाली स्थलांतरितांवरील कथित अत्याचारांशी संबंधित सरकारी ठरावावरील चर्चेदरम्यान हा गोंधळ झाला. गोंधळात शंकर घोष यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रूग्णवाहिकेने रूग्णालयात हलवण्यात आले. तर भाजपच्या किम घोष, अशोक दिंडा, अग्निमित्रा पॉल आणि मिहीर गोस्वामी आमदारांना निलंबित केले गेले आहे.

### महिलेवर अत्याचार

। बीड । प्रतिनिधी ।

बीडमधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी व माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण शिंदे यांच्यावर महिलेवर अत्याचार केल्याच्या प्रकरणात बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांपासून हा सगळा प्रकार सुरू असून, या कालावधीत नारायण शिंदे यांनी पीडित महिलेकडून तब्बल एक कोटी दहा लाख रुपये घेतल्याचेदेखील तक्रारीत म्हटले आहे. गंभीर बाब म्हणजे, हे प्रकरण मिटवण्यासाठी वाल्मीक कराड याने मध्यस्थी केल्याचा दावा या महिलेने तक्रारीत केला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, नारायण शिंदे याने एप्रिल २००६ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत आपल्या राहत्या घरी पीडित महिलेवर अत्याचार केले.

## प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी ताब्यात द्या

- **शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**
- **९ ऑगस्ट रोजी एकदिवसीय उपोषणाचा इशारा**

। कोर्लई । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील मेढेखार व कालवडखाडी येथील शेतकरी संघटनेच्याजवळजवळ ३८० शेतकऱ्यांच्या पटनी एनर्जी व इतर नऊ कंपन्यांनी १८ वर्षांपूर्वी अल्प दरात घेतलेल्या जमिनी ताब्यात द्याव्यात, या मागणीसाठी अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समिती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ९ सप्टेंबर रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन व उपोषण करणार आहे. याबाबतचे निवेदन संघटनेतर्फे अध्यक्ष बाळकृष्ण पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आमच्या शेतकरी संघटनेच्या जवळ जवळ ३८० शेतकऱ्यांच्या जमिनी में पटणी एनर्जी व इतर नऊ कंपन्या अशा एकूण १० कंपन्यांनी सुमारे १८ वर्षांपूर्वी अत्यंत कमी भावात खरेदी केलेल्या आहेत. त्यावेळी बऱ्याच शेतकऱ्यांना ५० टक्के एवढीच रक्कम मिळाली आहे, •> पान २ वर

### सख्ख्या भावावर प्राणघातक हल्ला



। रोहा । प्रतिनिधी ।

आपल्या पत्नीसोबत अनैतिक संबंध असल्याचे संशयाचे भूत डोक्यात गेलेल्या भावाने आपल्या सख्ख्या भावाला लोखंडी सळईने जबर मारहाण करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. भावावर प्राणघातक हल्ला करुन आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. मात्र, मध्यरात्री पोलिसांनी त्याला अटक करुन बेड्या ठोकल्या आहेत. •> पान २ वर

### शस्त्र घेऊन चोरटा घुसला बंगल्यात

। रोहा । प्रतिनिधी ।

हातात धारदार शस्त्र घेऊन एक परप्रांतीय तरुण चोरी करण्याच्या उद्देशाने आलिशान बंगल्यात घुसला. त्याच्या दहशतीला घाबरून घरातील दोन कामगार महिलांनी घराबाहेर पळून जाऊन बाहेरून दरवाजाची कढी लावली आणि घडलेला सारा प्रकार घरमालकाला सांगितला. यादरम्यान घरात अडकल्याच्या भीतीने त्या चोरट्याने घरातील किमती चीजवस्तूंची तोडफोड केली. मालकाने पोलिसांना घडलेल्या घटनेची माहिती देऊन तातडीने घटनास्थळी पोहोचण्याची विनंती केली. पोलीस येऊन आपल्याला अटक करणार या भीतीने बंगल्यात अडकलेल्या चोरट्याने •> पान २ वर

## विवाहितेवर अत्याचार, अभियंता गजाआड

। पनवेल । प्रतिनिधी ।

एका २७ वर्षीय सिव्हिल इंजिनीअर असलेल्या तरुणाने ३२ वर्षीय विवाहितेवर लग्नाचे आमिष दाखवून मागील दोन वर्षे लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी प्राप्त तक्रारीनंतर कळंबोली पोलिसांनी या तरुणाला अटक केली असून, त्याची रवानगी पोलीस कोठडीत करण्यात आली आहे.

रोहित चव्हाण हा सातारा, पाटण तालुक्यातील कोयना नगर येथे राहणारा आहे. तर, पीडित विवाहितेचे सासर सातारा येथील असून, तिला सात वर्षांचा मुलगा आहे. पीडितेचा पती दारुडा असल्यामुळे ती आपल्या मुलासह पवई येथे माहेरी राहते. २०२३ मध्ये पीडिता विवाहिता सातारा येथे राहत असताना, तिचे रोहित चव्हाणसोबत सूत जुळले त्याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तसेच तिच्या मुलाचा सांभाळ करणार असल्याचे सांगत तिला कळंबोली येथील देवांशी इन हॉटेल, लांजा-रत्नागिरी, आरोपीच्या राहत्या घरी, शिर्डी साई बाबा इंटरनॅशनल हॉटेल, तसेच वाशी पामबीच गॅलरिया ओयो टाऊनशिप हॉटेल अशा वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. मात्र, त्यानंतर रोहित चव्हाणचे दोन महिन्यांपूर्वी दुसऱ्या मुलीसोबत •> पान २ वर

## कंटेनर टर्मिनलच्या उद्घाटनाला पंतप्रधानांची दांडी





### जेएनपीए बंदर परिसरात नाराजीचा सूर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांनी प्रत्यक्ष उपस्थित न राहता गुरुवारी जेएनपीए येथील सिंगापूर बंदर प्राधिकरण (पीएसए) मुंबई कंटेनर टर्मिनल (बीएमसीटी) फेज-२ चे हैदराबाद हाऊस, नवी दिल्ली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. या ऐतिहासिक सोहळ्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उरण-रायगड येथे उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोग यांची निमंत्रण पत्रिकेत मुख्य अतिथी म्हणून नावे असतानादेखील चौथ्या बंदरातील दुसऱ्या टप्प्याच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित न राहिल्याने जेएनपीए व सिंगापूर बंदर परिसरात मोठ्या प्रमाणात नाराजीचा सूर घुमत होता.

कंटेनरटर्मिनलच्याउद्घाटनामुळे भारतातील सागरी व्यापार पायाभूत सुविधांमध्ये नवीन अध्याय सुरू झाला असून, हे टर्मिनल देशातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणी केंद्र बनले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यांनी महाराष्ट्राला समुद्री क्षेत्रातील महासत्ता बनवण्याचा संकल्प व्यक्त करत, या प्रकल्पाचे यश पंतप्रधान मोदींच्या अमृत काल दृष्टिकोनला समर्पित केले. •> पान २ वर

**बंदी असतानाही जेएसडब्ल्यूच्या बस पुलावरून सुरुच** | **जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली**

## धोकादायक पुलाला 'अवजड' त्रास

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली येथील पूल अवजड वाहतुकीस धोकादायक असल्याने या पुलावरून अवजड वाहनांना बंदी घातली आहे. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांच्या बंदीच्या आदेशाला झुगारून या पुलावरून जेएसडब्ल्यू कंपनीची अवजड वाहनांची वर्दळ सुरू असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळ धोकादायक पुलाला अवजड अशी परिस्थिती असतानाही प्रशासन मात्र निद्रावस्थेत असल्याचे दिसून आले आहे. नागरी व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी घेतलेला हा निर्णय फक्त जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयापुरता सीमित असल्याची



चर्चा सध्या जोर धरत आहे.

अलिबाग-रोहा, अलिबाग-रेवदंडा, पोयनाड-उसर-भादाणे व भाकरवड-देहेन या मार्गांवरील आठ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट विजना कन्स्लटींग इंजिनिअरिंग प्रा.लि. या संस्थेमार्फत करण्यात आले. त्यामध्ये अलिबाग-रोहा मार्गावरील रामराज पूल, नवघर

> **बंदीचे आदेश असलेल्या पुलावरून अवजड वाहतूक होत असल्यास संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल. त्यावर योग्य ती उपाययोजना करण्याचा प्रयत्न राहील.**
>
> **- आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

पूल, सुडकोली पूल, स्लॅब कलवर्ट, (पाण्याच्या अडथळ्यावर ठेवलेला सपाट आणि काँक्रिटचा बनवलेला भाग), अलिबाग-रेवदंडा मार्गावरील सहाण पूल, नवेदर बेली पूल, भाकरवड-देहन •> पान २ वर

पान १ वरून

## ...थेट पोलिसी दबाव

त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे याबाबत चर्चा केली आहे.

दरम्यान, शेतकरी सीताराम शामराव कवळे यांनी एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना लिहिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, त्यांनी व इतर शेतकऱ्यांनी वारंवार ठेकेदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे पर्यायी रस्त्याची मागणी केली. मात्र, याकडे दुर्लक्ष झाले. उलटपक्षी, विनंती करणाऱ्या शेतकऱ्यांची नावे थेट पोलिसांकडे देण्यात आली. शेतकऱ्यांना पोलीस ठाण्यात बोलविण्यात येऊन समज देण्यात आली. त्यामुळे ठेकेदाराकडून शेतकऱ्यांवर पोलिसी दबाव आणण्याचा आरोप करण्यात आला आहे.

**शेतकरी हक्कांवर घाला**

**कार्लेखिंड-थळ-परहूर परिसरातील शेतजमिनी शेतकऱ्यांचा एकमेव आधार असून, या रस्त्याखालचा प्रश्न आता शेतीच्या भवितव्याशी थेट जोडला गेला आहे. रस्ता पूर्णपणे काँक्रिटचा झाल्यानंतर घर, शेत, जनावरांचे गोठे अशा ठिकाणी जाण्याचा कोणताही मार्ग शिल्लक न ठेवता काम सुरू ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यात, शेतकरी प्रतिनिधींशी प्रत्यक्ष बैठक घेण्याची विनंतीही करण्यात आली होती. मात्र, ठेकेदारानी कोणतीही संवेदनशीलता न दाखवता, सर्व विनंत्यांकडे सपशेल दुर्लक्ष केले.**

**शेतकऱ्यांच्या मागण्या**

**परहूर तलाठी कार्यालयाजवळ शेताकडे जाण्यासाठी रस्ता/मार्ग त्वरित उपलब्ध करावा. शेतकऱ्यांवर आणला जाणारा दबाव तातडीने थांबवावा. ठेकेदार व अधिकारी यांनी शेतकऱ्यांची प्रत्यक्ष बैठक घेऊन समस्या सोडवावी. शेतकऱ्यांची उपजीविका, शेती व हक्क यांना धक्का न पोहोचवता रस्त्याचं काम पारदर्शक व न्याय्यतेने मार्गी लावावे.**

**ही गंभीर समस्या केवळ एका गावापुरती मर्यादित नसून, राज्यभरातील विकासकामांमध्ये स्थानिक शेतकरी व मालकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केल्यास असंतोषाचा भडका उडू शकतो, हे या प्रकरणावरून स्पष्ट होते. न्याय, संवाद, आणि न्याय्य विकास हे कोणत्याही नागरी भागातील आणि ग्रामीण भागातील लोकशाही व्यवस्थेचे खरे अधिष्ठान आहे, हे लक्षात ठेवणं आवश्यक आहे.**

**– संजय सावंत, सामाजिक कार्यकर्ते**

## ...जमिनी ताब्यात द्या

तर काही शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकलेल्या नसतानासुद्धा त्या कंपन्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे इतर लोकांच्या जमिनीसुद्धा ओसाड व खराब झालेल्या आहेत. जमिनी खरेदी करताना या सर्व कंपन्यांनी खरेदी केलेल्या जमिनीच्या ठिकाणी शेतीविषयक मालाचे व इतर प्रकल्प उभारण्यात येऊन शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना सदर प्रकल्पात नोकऱ्या देण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. परंतु, दिलेल्या आश्वासनांपैकी कोणतेच आश्वासन पूर्ण केले नाहीत. त्यामुळे येथील अन्यायग्रस्त स्थानिक शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना रोजगार मिळणे तर सोडाच; परंतु खरेदी केल्यापासून या सर्व जमिनी खाडीलगत असल्यामुळे आजपर्यंत येऊन गेलेले महापूर व मोठमोठ्या समुद्राच्या भरत्या यामुळे जमिनी अस्तित्वात राहिल्या नाहीत. त्यामुळे याठिकाणी फार मोठे मँग्रोजचे जंगल निर्माण झालेले आहे. प्रकल्प उभारले नाहीत. तसेच जमिनीची मशागत राखली गेली नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या मुलांना व नातेवाईकांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत, सर्वत्र बेरोजगारी वाढलेली आहे. शेतकऱ्यांवर गरीबी व उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच या धक्क्यामुळे व दु:खामुळे अनेक शेतकरी अकाली मृत्यू पावले आहेत.

दरम्यान, जमिनी शेतकऱ्यांच्या नावावर पुन्हा करून देण्यासाठी किंवा जमिनीत प्रकल्प उभारण्यासाठी येथील सर्व शेतकरी गेली १५ ते १६ वर्षांपासून सातत्याने कायदेशीर संघर्ष करीत आहेत, परंतु शासन व प्रशासनाकडून तसेच जमिनी खरेदी करणाऱ्या कंपनीकडून कोणत्याही प्रकारचे सहकार्य मिळत नाही. यामुळे अखेर नाईलाजास्तव शेतकरी संघटनेने दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे धरणे आंदोलन व उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

## ..भावावर प्राणघातक हल्ला

हा धक्कादायक प्रकार धाटाव परिसरातील महादेववाडी गावात घडला असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मंगळावार (दि.२) रोजी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास महादेववाडी गावातील सर्व ग्रामस्थ गणपती विसर्जनासाठी विसर्जनघाटावर गेले असताना याच दरम्यान कारविणे गावातील शिद कुटुंब गणेशोत्सवासाठी महादेववाडी या मूळ गावात आले होते. शिद कुटुंबातील सदस्यदेखील गणपती विसर्जनासाठी नदीकाठी गेले असता आरोपी लहू गुणाजी शिद याने या संधीचा फायदा घेत आपल्या पत्नीसोबत भावाचे अनैतिक संबंध असल्याचा संशय घेत व याच रागातून त्याने घराच्या ओटीवर बसलेल्या रमेश शिद या भावावर लोखंडी सळईने डोक्यात वार करून जीवघेणा हल्ला करुन त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. रक्ताच्या थारोळ्यात जखमी करुन घटनास्थळावरून तो फरार झाला. या गंभीर घटनेचे वृत्त परिसरात वाऱ्यासारखे पसरले आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेत जखमी रमेश शिद याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती समजताच पोलीस निरीक्षक मारुती पाटील आपल्या टीमसमवेत घटनास्थळी दाखल झाले. घटनेची माहिती घेतल्यानंतर पोलिसांनी आरोपीची शोधमोहीम सुरु केली. मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास आरोपीला ताब्यात घेऊन त्याला तात्काळ पोलिसांनी अटक करुन त्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत त्याची पत्नी सुवर्णा लहू शिद हिने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## पोलिसांवर कुऱ्हाडीने हल्ला

असलेल्या नातेवाईकांना बाहेर येण्यास सांगितले असता त्याने त्याचे आई, वडील, भाऊ व भावाची तीन मुले यांना घराबाहेर जाण्यास मज्जाव केला, तसेच त्याने त्याची १६ वर्षीय पुतणी निकिता महातो हिला जबरदस्तीने स्वतःच्या कब्जात ठेवून तिच्या गळ्याला कोयता लावून तिला ठार मारण्याची धमकी देत असताना पोलिसांनी कौशल्यपूर्ण आत प्रवेश करून त्याला घातक शस्त्रांसह ताब्यात घेतले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त परिमंडळ-३ चे प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले आदींनी तातडीने पोलीस ठाण्यात पोहोचून संपूर्ण घटनेची माहिती घेतली आहे.

## ... ग्रामस्थांची फसवणूक

हनुमान कोळीवाड्याला न्याय मिळाला नाही. उलट, केंद्र सरकारने प्रस्तावित १०.१६ हेक्टर जमीनही केराच्या टोपलीत फेकली. जेएनपीए अध्यक्ष उन्मेष वाघ यांनीच हा प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठविला होता, पण मंत्रालयाच्या उदासीनतेने ग्रामस्थांच्या जखमेवर मीठ चोळले आहे.

वाळवीने पोखरलेल्या आणि अपुऱ्या जागेत ढकललेल्या २५६ कुटुंबांचा प्रश्न आणखी गंभीर झाला आहे. अनेक कुटुंबे तात्पुरत्या शिबिरात विसावली आहेत. तरीही सरकारला यांचे दुःख दिसत नाही, कारण सरकारच्या नजरेत जमीन मौल्यवान, पण गावकऱ्यांचे आयुष्य मात्र स्वस्त आहे.

मंत्रालयाचे सचिव आय.जी. बालिश यांनी दिलेल्या आदेशानुसार, जमीन नाही, थेट क्लस्टरमध्ये इमारती उभारून पुनर्वसन करा, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे 'जमीन द्या' या मागणीऐवजी 'काँक्रिटच्या कैदेत राहा' हा सरकारी दंडादेश ग्रामस्थांवर लादण्यात आला आहे. दरम्यान, या अन्यायकारक निर्णयामुळे हनुमान कोळीवाड्यात संतापाची लाट उसळली असून, पुढील काही दिवसांत उग्र आंदोलन पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## ..चोरटा घुसला बंगल्यात

थेट पहिल्या मजल्यावरून उडी घेतली. या घटनेत चोरट्याचे दोन्ही पाय फॅक्चर झाले. आता चोरट्याला पळता येत नसल्याने घरमालक आणि नोकरांनी त्याला दोरीने बांधून ठेवून नंतर पोलिसांच्या स्वाधीन केले. ही घटना एखाद्या चित्रपटात शोभून दिसणारी असली तरी प्रत्यक्षात घडलेली हकीकत आहे. दिवसाढवळ्या रोह्यात अशा पद्धतीची धक्कादायक घटना घडल्याने साऱ्यांची आश्चर्य व्यक्त केले.

या बाबत घडले असे की, रोहे रेल्वे स्टेशनच्या पलीकडे नव्याने तयार होत असलेल्या मेघासिटी फेस २ या परिसरात पिंगळसई येथील सुनिल मुटके यांचा दोन एकर जागेत फार्म हाऊससहित आलिशान बंगला बांधला आहे. या बंगल्यात सोमवारी (ता. १) रोजी दुपारी १:४५ वा.च्या सुमारास गंदूर झगरू ओरण लकडा (रा. केडली जि. गुमला-झारखंड) या परप्रांतीय चोरट्याने आपल्या हातातील कुदल व फावड्याने बंगल्याच्या मुख्य दरवाजाची काच फोडून आत प्रवेश केला. दरम्यान फार्म हाऊसची देखरेख करण्यासाठी असलेल्या संगीता वाळेकर व त्यांची मुलगी अनु अनिल वाघमारे यांनी घाबरून बंगल्याबाहेर पळ काढला आणि बंगल्याच्या दरवाजाला बाहेरून कढी लावून घडलेल्या घटनेची माहिती सुनिल मुटके या घर मालकाला दिली. घरमालकाने पोलिसांना घटनेची माहिती दिली. दरम्यान बंगल्याला बाहेरून कढी लावल्याची माहिती समजताच बंद घरात अडकलेल्या चोराने घरातील टेबल, टीव्ही, गॅस, अशा ७५ हजार रु. किमतीच्या चीजवस्तू हातातील कुदळ व फावड्याने फोडून सामानाची नासधूस केली. आता आपली यातून सुटका होणार नाही, म्हणून त्याने इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारून पळून जाण्याचा बेत अखला आणि त्याने खाली उडी मारली. यादरम्यान खाली काँक्रिटीकरण असल्याकारणाने त्याचे दोन्ही पाय फॅक्चर झाले. आणि त्याला पळता येत नसल्याने घरमालक आणि महिलांनी त्याला दोरीने बांधून ठेवले. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पहिल्या माल्यावरून उडी घेतल्याने चोराचे दोन्ही पाय फॅक्चर झाल्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या घटनेबद्दल पुढील तपास पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा. रसाळ करीत आहेत.

## विवाहितेवर अत्याचार

लग्न जुळले. याबाबतची माहिती पीडितेला कळताच तिने रोहितच्या भावी पत्नीला व तिच्या आई-वडिलांना तिचे व रोहितमध्ये असलेल्या प्रेमसंबंधाची माहिती दिली. त्यामुळे रोहितचे लग्न मोडल्याने रोहितला राग आला. त्यातूनच त्याने पीडित विवाहिता व तिच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पीडितेने पवई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी रोहित चव्हाणविरोधात लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी तसेच धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. हा गुन्हा कळंबोली पोलिसांकडे वर्ग केला होता. त्यानुसार आरोपी रोहित चव्हाण याला अटक करण्यात आल्याची माहिती कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी दिली.

## ..पुलाला 'अवजड' त्रास

रस्त्यावरील देहेन पूल या पुलांचा समावेश आहे. या पुलांची व स्लॅब कलवर्टची रस्त्यावरील भारक्षमता पाच ते १६ टन असल्याचे स्पष्ट झाले आहे. महत्त्वाच्या रस्त्यांवरील पूल व स्लॅब कलवर्ट संरचनात्मकदृष्ट्या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी या आठ धोकादायक पुलांवरून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्काळ बंदी घालणारा आदेश जारी केला. पूल अधिक असुरक्षित झाल्याने वाहनचालकांनी व ट्रान्सपोर्ट संस्थांनी प्रशासनाच्या आदेशाचे काटेकोर पालन करावे. अपघात टाळण्यासाठी व जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कार्यवाही करण्यात आली असल्याचे लेखी आदेश काढले होते. नियमभंग करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी लेखी पत्र काढले होते. मात्र, अलिबाग-रोहा मार्गावरील नवघर, सुडकोली येथील धोकादायक पुलांवरून काही खासगी ट्रक, डंपरसारखी अवजड वाहने बिनधास्तपणे धावत आहे. अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नवेदर बेली येथील पुलावरून जेएसडब्ल्यू कंपनीच्या वाहनांचीदेखील वर्दळ कायमच असते. जिल्हाधिकारी जावळे यांच्या आदेशाची पायमल्ली काही खासगी व कंपनीतील वाहन चालकांकडून होत आहे. याकडे मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला झुगारून या पुलांवरून अवजड वाहतूक होत असताना, प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. नागरी व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी घेतलेल्या आदेशाला केराची टोपली दाखविली जात आहे. त्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

## कंटेनर टर्मिनलच्या उद्घाटनाला पंतप्रधानांची दांडी

जेएनपीए आणि पीएसएच्या सहकार्यामुळे हे टर्मिनल भारतातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणी केंद्र बनले आहे. वाढवण बंदराच्या कार्यान्वयनामुळे जेएनपीए लवकरच जगातील पहिल्या दहा बंदरांमध्ये स्थान मिळवेल. यामुळे महाराष्ट्र पुढील शंभर वर्षांसाठी समुद्री क्षेत्रातील महासत्ता म्हणून उदयास येईल. याप्रसंगी भारत आणि सिंगापूर यांच्यात नवीन करारनाम्यांवर स्वाक्षऱ्या झाल्या, ज्यामुळे द्विपक्षीय सहकार्य आणखी बळकट होईल. या टर्मिनलमुळे महाराष्ट्राने भारतातील बंदर क्षमतेत पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावले असून, जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

# रायगडात करणार अंमलबजावणी

## ● जिल्हा परिषद प्रशासनाचा नियोजनबद्ध कार्यक्रम

**| रायगड | प्रतिनिधी |**

गावांचा शाश्वत विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरदरम्यान राबविण्यात येणार असून, या अभियानाचीप्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद प्रशासन सज्ज झाले आहे. अभियानांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम तसेच आवश्यक सूचना संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिल्या आहेत. या अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना राज्य शासनाकडून पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात विकासाच्या बहुतांश योजना ग्रामपंचायत, पंचायतसमिती व जिल्हापरिषदांच्या माध्यमातून राबविण्यात येतात. त्यामुळे त्यांना कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे, ग्रामपंचायतीमध्ये लोकसहभागाचीचळवळ निर्माण करणे, आरोग्य, शिक्षण, उपजीविका, सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवून पंचायत राज संस्था गतिमान करणे, या संकल्पनेतून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्य शासनाने जाहीर केले आहे. हे अभियान तालुका, जिल्हा, महसूल विभाग आणि राज्य अशा चार स्तरांवर राबविले जाणार आहे.



### कार्यशाळेचे आयोजन

या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरिता जिल्ह्यातील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांची जिल्हास्तरीय कार्यशाळा ८ सप्टेंबर रोजी कुरुळ येथील आरसीएफ सभागृहात आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाने दिली आहे.

### अभियानाचे प्रमुख सात घटक

लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन तयार करणे. सक्षम पंचायत, स्वनिधी, विकासनिधी व लोकवर्गणीतून पंचायत राज संस्थांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे. जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे. गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे. उपजिविका विकास व सामाजिक न्याय लोकसहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ

यामधून ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांना मोठ्या रकमेचे पुरस्कार मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

सदर अभियान जिल्ह्यात सुनियोजितपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज होत आहे. प्रत्येक तालुक्यात अभियानासाठी २० ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली असून, सदर ग्रामपंचायतींकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. सदर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी कोकण विभागीय आयुक्त यांनी जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी म्हणून अप्पर आयुक्त आस्थापना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी प्रत्येक तालुक्यासाठी जिल्हा परिषदेच्या खाते प्रमुखांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

# एक वही, एक पेन घेऊन या...

## ● जयदीप सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा स्तुत्य उपक्रम

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आघाडीचे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि नेरळ पूर्वेचा राजा म्हणून लोकप्रिय असलेल्या जयदीप सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे 'एक वही, एक पेन' या उपक्रमाचे कौतुक होत आहे. गेली पाच वर्षे मंडळ हा उपक्रम राबवत असून, दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांनी दर्शनासाठी येताना वही, पेन घेऊन यावे, असे आवाहन केले जाते. दरम्यान, मंडळाच्या गणेशोत्सव काळात गोळा होणाऱ्या वह्या आणि पेन आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना दिल्या जातात.



१९८९ मध्ये ज्येष्ठ साहित्यिक सु.ना. देशपांडे यांच्या पुढाकाराने नेरळ एसटी स्टँड परिसरात जयदीप क्रीडा मंडळाची स्थापना झाली. नंतर या मंडळाच्या वतीने अनेक सार्वजनिक उपक्रम राबवत पुढे भाद्रपद महिन्यातील सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होण्यास सुरुवात झाली. नेरळ पूर्व भागातील राजा म्हणून हा बाप्पा ओळखला जातो. या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या सार्वजनिक उपक्रम यामुळे रायगड जिल्ह्यातील विविध संस्थांनी गौरव केला आहे. गणेशोत्सव काळात भक्तांना दर्शनासाठी येताना मोदक, पेढे न आणता, वह्या, पेन आणण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार मागील पाच वर्षे हा उपक्रम यशस्वी होत असून, या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

**पनवेल महानगरपालिका**
**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com
जा.क्र./पमपा/वै.आ.वि/९३८/सन २०२५-२६ दिनांक : ०४/०९/२०२५

**जाहिर सुचना**
**प्रथम मुदतवाढ**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुत्रपिंड आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांना पालिकेमार्फत मोफत डायलॅसिस सेवा उपलब्ध करुन देणेकामी पालिकेने खारघर व नवीन पनवेल येथे ०२ डायलॅसीस युनिट (प्रत्येकी २५ खाटांचे) सेंटर कार्यान्वित करण्यात येणार आहे. या डायलॅसिस युनिटमध्ये उपचार घेण्याऱ्या रुग्णांना Liquid Oxygen, Medical Oxygen, Medical Nitrous oxide इत्यादी मेडिकल गॅसची आवश्यकता भासणार आहे. याकरिता गॅस पुरवठा करणेकामी कंत्राटी तत्वावर एजन्सीची नेमणुक करण्यात येणार आहे. याकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील नमुद केलेल्या बाबींकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | प्रथम मुदतवाढ |
|---|---|---|
| १ | Supply of Refilled Medical Gas Cylinders for PMC Dialysis Center on Contract basis. | ०४/०९/२०२५ ते १२/०९/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

**कामाचा तपशिल खालीलप्रमाणे:**

| Sr. no | Types of Gas Cylinder | Capacity of cyl. | Quantity | Rate Per Cylinder / M3 |
|---|---|---|---|---|
| 1 | Liquid Oxygen Dura Cylinder | 200 Ltr (175 CuM) | 01 | |
| 2 | Jumbo Cylinder ( D-Type) | 7 CuM./Cyl. | 01 | |
| 3 | Medical Oxygen Gas Cylinder | 660 Ltr. (0.660 CuM) | 01 | |
| 4 | Medical Oxygen | 1320 Ltr (1.320 CuM) | 01 | |
| 5 | Nitrous Oxide | 17233 Ltr 01 (17.233 CuM) | | |
| 6 | Nitrous Oxide | 1851 Ltr (1.851 CuM) | 01 | |
| 7 | Medical Oxygen Tank | 10 Kl (10KL *0.877.1000 = 8770M3) | 01 | |
| | | 13 KL (13KL*0.877.1000) = 11401 M3 20 KL | 01 M3 | |

४. सीलबंद दरपत्रके दिनांक १२.०९.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागात स्वीकारण्यात येतील.
५. प्राप्त झालेली दरपत्रके शक्यतो दिनांक १२.०९.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता (शक्यतो) उपस्थितीत ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
६. अटी व शर्तीयुक्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

**सही/-**
**(प्रसेनजीत कारलेकर)**
**उपायुक्त (आरोग्य)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/९३८/ सन २०२५-२६
दिनांक : ०४.०९.२०२५

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 01 | **Tender No:** EE/EHV (O & M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-18/IInd Call/2025-26 Dtd:-05.09.2025. **RFx No. 7000037133** | **Sub.:** Second Call for SRM E-tender for Servicing & alignment of 245kV, 145kV and 36kV Isolators at 220kV Kandalgaon Substation, 220kV Mahad Substation & 100kV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad. | Rs.15,00,000/- (including GST + 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. Bid submission is from 05.09.2025 @ 00:00 hrs to 14.09.2025 @23:59Hrs for above tender. For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer (I/c)**
**EHV (O&M) Dn. Mahad**

**जाहीर समन्स/नोटीस**

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३०/२०२५

श्रीमती प्रतिक्षा प्रदिप गोडबोले वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर संमन्स/नोटीसद्वारे आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडिल कै प्रदिप पांडुरंग गोडबोले यांचे दिनांक २६/०७/२०२४ रोजी मौजे वावे ता. पेण येथील ''संजिवनी हॉस्पिटल'' येथे उपचारादरम्यान निधन झाले आहे. कै.प्रदिप पांडुरंग गोडबोले हे त्यांचे मृत्युपुर्वी मा.न्यायालयाचे स्थळसिमेत वास्तव्यास होते. त्यांचे पश्चात त्यांचे वारस म्हणुन अर्जदार यांस अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक क्र. ALB000005153 (जुना मालमत्ता क्र.१०५८) ''गोडबोले रेसिडेन्सी'' या इमारतीचे पहिल्या मजल्यावरील वाणिज्य गाळा (कार्यालय) क्र. ३ क्षेत्र २३.६३ चौ.मीटर व ''गोडबोले रेसिडेन्सी'' या इमारतीचे दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. २०२ क्षेत्र ७०.८५ चौ. मीटर ही मिळकत आणि ''गोडबोले रेसिडेन्सी'' या इमारतीचे चौथ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ४०२ क्षेत्र २५.४२ चौ.मीटर या मिळकतींबाबत अर्जदार यांनी कै. प्रदिप पांडुरंग गोडबोले यांचे वारस म्हणून ठराव करून मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब, या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे नावे असा दाखला देण्यास व जाहीर ठराव करणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वत: अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक ०६/१०/२०२५ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख: कोर्टाचा शिक्का

नि ८/ड

**दिवाणी न्यायालय क. स्तर कर्जत**

दिवाणी चौकशी अर्ज १२६/२०२५
निशाणी नं.
ने. ता. १६/१०/२०२५
ॲड.नरेश मारूती बैलमारे

**जाहीर नोटीस**

१) समीर मधुसुदन विद्वांस
वय ४७ वर्षे, रा. यश लक्ष्मी बिल्डींग नं. १,
दुसरा मजला, ब्लॉक नं. २०२, भिसेगाव,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१ ... अर्जदार नं. १
२) सचिन मधुसूदन विद्वांस
वय ५२ वर्षे, रा.१०२, न्यू सरस्वती छाया
को. ऑप. हौ. सो., डॉ. राजेंद्र प्रसाद रोड,
राम नगर पोस्ट ऑफीस जवळ, राम नगर,
डोंबिवली (पूर्व), ठाणे- ४२१ २०१. ... अर्जदार नं. २
३) मानसी माधव पटवर्धन
वय ५७ वर्षे, रा. १८, पांडूरंग निवास,
न्यू आयरे रोड, साई बाबा मंदिराजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (प.), ठाणे.
पिन नं. ४२१ २०१. ...अर्जदार नं. ३
४) संजीवनी विश्वनाथ मराठे
वय ५६ वर्षे, रा. ए - ९०५, ९वा मजला,
रेहाब बिल्डींग, 'ए' विंग, जी. डी. आंबेकर
मार्ग, पटेल वाडी, परेल, मुंबई - ४०० ०१२ ... अर्जदार नं. ४

ज्याअर्थी, अर्जदार कर्जत येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक १२६/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जामधील अर्जदार नं. १ ते अर्जदार नं. ४ यांचे वडील कै. श्री. मधुसूदन प्रभाकर विद्वांस हे दिनांक २२/०६/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तसेच, अर्जदार नं. १ ते अर्जदार नं. ४ यांची आई कै. जयश्री मधुसूदन विद्वांस या दिनांक ३०/०७/२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशिर वारस असले बाबत दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की, कै. श्री. मधुसूदन प्रभाकर विद्वांस व कै. जयश्री मधुसूदन विद्वांस यांच्या वारसांबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास, ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० (तीस) दिवसांच्या आत लेखी पुराव्यासह या मे. न्यायालयांत दाखल करावी. अन्यथा सदरील अर्जदार हेच कै. श्री. मधुसूदन प्रभाकर विद्वांस व कै. जयश्री मधुसूदन विद्वांस यांचे कायदेशीर वारस आहेत, असे समजून सदरील अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक ०३/०९/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी जाहीर नोटीस दिली आहे.

सही/- **क. लिपीक दिवाणी न्यायालय, क. स्तर, कर्जत.**
सही/- **सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, क. स्तर, कर्जत.**

**पनवेल महानगरपालिका**
**वैद्यकीय आरोग्य विभाग**
कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर,
गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१०२०६.

दुरध्वनी कार्यालय :०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
उपायुक्त कार्यालय :०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय:०२२-२७४५२३३९
ई-मेल:panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com
जा.क्र./पमपा/वै.आ.वि/९४१/सन २०२५-२६ दिनांक:- ०४/०९/२०२५

**Corrigendum**

Tender No. 2025_PMC_1212593_1 MHD/०३/२०२५-२६(२nd Call)

पनवेल महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी Portable Handend Digital X-ray Machine with AI Software of Tuberculosis Detection (Chest AI) चे ०४ युनिट खरेदी करणेकरिता दिनांक २२.०८.२०२५ रोजी ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम मुदतीअंती फक्त ०२ ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार ई-निविदास पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने ई-निविदेस दिनांक ०४.०९.२०२५ पासुन सात दिवसाची द्वितीयची मुदतवाढ देण्यात येत आहे.

| Sr.no | Description | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | Bid Submission End Date | १२.०९.२०२५ | ०३.०० PM |
| २ | Bid Opening Date | १५.०९.२०२५ | ०३.०० PM |

Sd/-
**Medical Officer Of Health**
**Panvel Municipal Corporation.**

# भोनंगच्या पुलाला दुरुस्तीची प्रतिक्षा

## ■ रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

**अलिबाग तालुक्यातील भोनंग, तळवली अशा अनेक गावांना जोडणारा भोनंग पुल सुमारे ४५ वर्षे जूना आहे. या पुलाची दुरुस्ती करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरले आहे. परिणामी हा पुल जीर्ण झाला आहे. या पुलाचे लोखंडी कठडे खराब झाले असून, संपूर्ण पुलाला गवत-झुडपाने विळखा घातला आहे. तसेच, पुलावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या पुलाकडे जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांसह पादचाऱ्यांमध्ये नाराजीचे सुर उमटत आहेत.**



अलिबाग-रोहा मार्गावरील फणसापूर गावापासून काही अंतरावर सुमारे ४५ वर्षांपूर्वी भोनंगचा पुल बांधण्यात आला होता. या पुलामुळे, फणसापूर, बापळे, तळवली, भोनंग, भागवाडी, नवखार, कुदे, सुडकोली, ताजपूर आदी गावे, वाड्या जोडल्या गेल्या आहेत. या गावांतील नागरिकांसह विद्यार्थी व अन्य प्रवाशांना ये-जा करण्यास फायदा होत आहे. या पुलावरील रस्ता जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येतो. परंतु, या रस्त्याची अवस्था बिकट होत असताना पुलाची अवस्थादेखील दयनीय झाली आहे. अलिबाग-रोहा मार्गावरील रामराज मार्गे प्रवास लांब पडत असल्याने या पुलावरून जाण्यास अधिक पसंती दिली जात आहे. अलिबाग-रोहा असा प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी या पुलावरील वाहतूक सोपी आणि कमी वेळेत पोहचण्यासारखी आहे. त्यामुळे या पुलावरून शेकडो वाहने धावत असतात. परंतु, या ४५ हून अधिक वर्षे जून्या असलेल्या पुलाची दूरुस्ती करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरल्याचे चित्र दिसून आले आहे.

भोनंग पुलाच्या सुरुवातीपासून ते पुल संपेपर्यंत ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या पुलाच्या दोन्ही बाजूला असलेले लोखंडी पोल खराब झाले आहेत. काही पोल तुटलेल्या अवस्थेत आहेत. पूलाच्या दुतर्फा गवत व झुडपाने विळखा घातला आहे. सध्या नवघर पुलावरून वाहतूक बंद केली आहे. परंतु, भोनंग पुलाची वेळेवर दुरुस्ती केल्यास हा पुल वाहतूकीसाठी फायदेशीर ठरणारा आहे. तसेच, रोहा-अलिबागला ये-जा करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेवर पोहचता येणार आहे. याकडे जिल्हा परिषद बांधकाम विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

> **रस्त्यासह साकव दुरुस्तीसाठी शासनाकडे निधीची मागणी केली आहे. १६ कोटीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. निधी प्राप्त झाल्यावर तातडीने रस्ते, साकव दुरुस्त केले जातील.**
> **- राहूल देवांग, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, रायगड जिल्हा परिषद**

### निधीचा प्रस्ताव लाल फितीत

रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणारे पुल व खड्डेमय रस्ते दुरुस्त करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने शासनाकडे मागमी केली आहे. याबाबत जिल्हा परिषदेकडून १६ कोटी रुपयांचा प्रस्ताव मार्च महिन्याच्या अगोदर पाठविला आहे. परंतु, शासनाकडून रस्ते व पुल दूरुस्तीसाठी निधीच अद्याप उपलब्ध झालाच नाही. त्यामुळे हा प्रस्ताव लाल फितीत अडकून बसल्याची माहिती समोर येत आहे.

# निवडक



## पीएनपी स्कूलमध्ये गणेशोत्सव साजरा

**अलिबाग :** गणेशोत्सव हा आनंद, एकता आणि संस्कृतीचा संगम आहे. या विचारातून होली चाईल्ड सीबीएसई स्कूलमध्ये गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. गणेशोत्सव हा उत्साहपूर्ण आणि आनंददायी सोहळा होता, ज्यात विघ्नहर्ता व बुद्धीचा देव म्हणून पूजल्या जाणाऱ्या भगवान गणेशाच्या जन्माचा गौरव करण्यात आला. यावेळी शाळेच्या आवारात रंगीबेरंगी रांगोळ्या, फुलांची सजावट आणि रोषणाईने उत्सवी वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मिळून सजावट केली आणि सांस्कृतिक अभिमान प्रकट केला. सामूहिक प्रार्थना, आरती, मंत्रपुष्पांजली, गणपती अथर्वशीर्ष, भजनांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, भाषण व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे आपले कलागुण सादर केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वेल्लईम्मल्ल वेणी, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदि मोठ्या संखेने उपस्थित होते.

## शेकापतर्फे पनवेलमध्ये रोजगार मेळावा

**रायगड :** जिल्ह्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातील युवकांना रोजगाराचे दालन खुले व्हावे, म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने रोजगार मेळावा भरविण्यात येणार आहे. शेकाप राज्य खजिनदार अतुल म्हात्रे यांच्या पुढाकाराने हा मेळावा मंगळवारी (दि.९) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास होणार आहे. बारावीपासून पदवीधर झालेल्या तरुणांसाठी हा मेळावा घेण्यात येणार आहे. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळावे, यासाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. पात्र ठरलेल्या तरुणांना या मेळाव्यातून जागेवर रोजगार नियुक्तीचे पत्र दिले जाणार आहे. रोजगार मेळावा पनवेल येथील ओरियन मॉलसमोरील निलकंठ दर्शन येथे होणार आहे. नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांसाठी ही सुवर्ण संधी शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून देण्यात आली आहे. गुणपत्रिका, आधारकार्ड, दोन छायाचित्र, बायोडाटा, पॅनकार्ड आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. अधिक माहितीसाठी रोजगार विभाग (७७१०८१९६८१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




## बसस्थानकात चाकरमान्यांची गर्दी

**तळा :** बाप्पाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर गणेशोत्सवासाठी गावाला आलेले चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागले आहेत. त्यामुळे तळा बस स्थानकात प्रवाशांची गर्दी झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मोठ्या संख्येने नोकरी धंद्यासाठी व कामानिमित्त शहरांमध्ये स्थलांतरित झालेले नागरिक गणेशोत्सवासाठी आपल्या गावी परतत असतात. गणेशोत्सव काळात पाच दिवस गणरायाची मनोभावे पूजा अर्चा करून शेवटच्या दिवशी बाप्पाला भावपूर्ण वातावरणात निरोप देऊन चाकरमानी पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला लागले आहेत. त्यासाठी तळा बसस्थानकात बसमध्ये आपली आरक्षित केलेली जागा शोधण्यासाठी प्रवाशांची लगबग पाहायला मिळाली. चाकरमानी प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी प्रशासनाकडून बसस्थानकातून दोन दिवस एसटीची जादा वाहतूक व्यवस्था करण्यात आली होती.

# पनवेल मनपाची प्रारूप प्रभाग रचना जाहीर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेची पहिली निवडणूक प्रक्रिया २०१७मध्ये पार पाडली. या निवडणुकीत जी प्रभाग रचना होती, जवळपास त्याच पद्धतीच्या प्रभाग रचनेचे प्रारूप महापालिका कार्यालयातील दर्शनी भागात प्रसिद्ध करण्यात आले. १५ सप्टेंबरपर्यंत या प्रारूपविषयी पनवेलचे नागरिक त्यांच्या हरकती नोंदवू शकणार आहेत.

२०१७ मध्ये ५,०९,९०१ ही आधारभूत लोकसंख्या ग्राह्य धरून प्रभाग रचनेचे प्रारूप बनविण्यात आले होते. तशाच प्रकरची रचना यावेळीही कायम आहे. यामध्ये २० वेगवेगळे प्रभाग दर्शविण्यात आले आहेत. कामोठे येथील प्रभाग क्रमांक ११ हा महापालिका क्षेत्रातील सर्वात लहान लोकसंख्या असलेला प्रभाग गणला गेला असून याची लोकसंख्या १९,३७४ एवढी दर्शविण्यात आली आहे. तसेच, प्रभाग क्रमांक १४ मध्ये कामोठे वसाहतीचा मोठा भाग असल्याने या प्रभागाची लोकसंख्या २८,३०८ नोंदवली गेली. पनवेल व नवीन पनवेल येथील प्रभाग क्रमांक १६ आणि १७ यांची लोकसंख्या २८ हजारांवर दर्शविण्यात आले आहे. २०१७ मध्ये खारघर, कामोठे, कळंबोली या सिडको वसाहतींची लोकसंख्या आधारभूत धरून प्रारूप बनविण्यात आल्याने या वसाहतींमधील नवीन प्रारूप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली.

# नागोठण्याचे प्रभारी अधिकारी ॲक्शन मोडवर

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यात विविध प्रकारच्या अवैध धंद्यांसह गुटखा व सुगंधी पान मसाला विक्री सुरू होती. याबाबतचे वृत्त दैनिक ‘कृषीवल’ वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याची दखल घेत नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी ॲक्शन मोडवर आले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे शहर व परिसरातील अवैध गावठी दारू, गुटखा व इतर अवैध धंदे प्रकरणी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. तसेच, बेशिस्तपणाच्या इतर प्रकरणातील पोलिसांनाही सक्त तंबी देण्यात आल्याची माहिती प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांनी दिली आहे.



कृषीवल इफेक्ट

नागोठणे परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट सुरू आहे. याठिकाणी अवैध गावठी दारू, गुटखा व पानमसाल्यासारखे पदार्थांची सर्रास विक्री सुरू असून त्याला मोठ्या प्रमाणात तरूण मंडळी बळी पडत आहे. त्यामुळे त्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. याबाबतचे वृत्त ‘कृषीवल’ वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते. त्याची तात्काळ दखल घेत नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी येथील विविध प्रकारच्या अवैध धंद्याची शोधमोहीम सुरू केली आहे. त्यांच्या पथकाकडून वरवठणे येथे अवैध गावठी दारू विक्री करणाऱ्या एका महिलेविरोधात कारवाई केली आहे. त्या महिलेकडून सुमारे १ हजार रुपये किमतीची १० लिटर दारू जप्त करण्यात आली आहे.

याशिवाय नागोठण्याचे पोलीस उपनिरीक्षक जि.डी. पावरा, उपनिरीक्षक सुरज पाटील यांच्या पथकाकडून अवैध गुटखा, सुगंधी पान मसालाप्रकरणी परिसरातील सर्व टपरीधारक व किराणा माल दुकानदारांची तपासणी करण्यात आली. त्यांची कसून तपासणी करण्यात आली असून कोठेही गुटखा मिळून आल्यास कायदेशीर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांनी केलेल्या या कारवाईचे स्वागत करण्यात येत असून ‘कृषीवल’चे देखील आभार व्यक्त करण्यात येत आहे.

# महाड-किल्ले रायगडदरम्यान रस्ता खचला

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाडमधील किल्ले रायगडकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अक्षय कन्स्ट्रक्शन कंपनीकडून सुरू असून हा रस्ता रायगड घाटात खचला आहे. त्यामुळे ठेकेदार कंपनीच्या निकृष्ट दर्जाच्या कामाकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे जाणिवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याचे उघड होत आहे.



महाड ते किल्ले रायगडपर्यंत जाणारा रस्ता पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होता. आता हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित झाला असून पूर्वी डांबरीकरणाचा असलेला रस्ता आता दुपदरी कॉंक्रिटीकरणाने बनविला जात आहे. अक्षय कन्स्ट्रक्शन कंपनीला हे काम करीत आहे. मात्र, ही कंपनी सुरुवातीपासूनच कायम वादात राहिली आहे. या रस्त्यावरील कोंजरपासून पूर्वीचा असणारा घाट रस्ता बंद करून नवीन रस्ता बनविला आहे. मात्र, याच रस्त्यावरील घाटातील डांबरीकरणाचा व कॉंक्रीटीकरणाचा काही भाग खचला आहे. काही ठिकाणी साईडपट्ट्या देखील खचल्या आहेत. या भागातून अवजड वाहन गेल्यास खचलेल्या साईडपट्टीमुळे अपघात होऊन ते वाहन खोल दरीत कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ठिकाणी एखादा अपघात झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाचे डोळे उघडणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# शिक्षणरत्न पुरस्कार २०२५ जाहीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मराठी भाषा संवर्धन प्रचार प्रसार हेतूने स्थापन झालेल्या साहित्यसंपदातर्फे समाजात बहुमूल्य योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान ‘शिक्षक रत्न पुरस्कार २०२५’ देऊन करण्यात येतो.

याचेळी निवृत्ती नंतरही आपले ज्ञानदानाचे काम पाहून अनेकांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रो. चंद्रकांत लंगोटे यांना आजीवन सेवेसाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. तसेच, शिक्षण कार्यातून मुलांच्या प्रतिभेस वाव देताना सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक योगदानात भर घालणारे आणि त्यासाठी इतर शिक्षकांनाही प्रोत्साहित करणारे डॉ.संदीप जोशी व डॉ. ओमकार पोटे यांच्या विशेष कार्याची दखल पुरस्कार जाहीर करून घेण्यात आला. दुर्गम भागातील मुलांना संशोधनास मदत करणारे डॉ. चंद्रभान टेंभूर्णेकर यांची सुद्धा निवड पुरस्कार्थी म्हणून करण्यात आली आहे.

# भेसळयुक्त पदार्थांचा प्रश्न ऐरणीवर

**। उरण । प्रतिनिधी ।**

सणासुदीच्या दिवसात मिठाई व पेढ्यांच्या दुकानात भेसळयुक्त पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरु झाला आहे. त्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात भेसळयुक्त पदार्थांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सणासुदीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात मिठाई, पेढे यांसह दुग्धजन्य पदार्थांचे मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. त्यामुळे असे पदार्थ विकताना सुरक्षिततेची काळजी व्यापाऱ्यांनी घ्यावी, तसेच भेसळयुक्त पदार्थांची विक्री करू नये, असे आवाहन लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. तर, ग्राहकांना भेसळयुक्त पदार्थ आढळून आल्यास त्याची त्वरित तक्रार प्रशासनाकडे करण्यात यावी. मिठाई विक्रेत्यांनी ताजी व चांगली मिठाई विक्रीस ठेवावी, असे आवाहनही संस्थेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष रमेश म्हात्रे यांनी केले आहे.

सणासुदीच्या दिवसांमध्ये मिठाई पेढे व अन्य दुग्धजन्य पदार्थ यांची वाढती मागणी लक्षात घेता अनेकदा यामध्ये भेसळ करण्यात येते. दुधामध्ये पाणी, साखर, कॉस्मेटिक पदार्थ, डिटर्जंट्स, युरिया, सोडियम क्लोराईड, अमोनियम क्षार, सॅलिसिलिक ॲसिड, बोरिक ॲसिड, मेलामाइन, हायड्रोजन पेरोक्साइड, फॉर्मल्डिहाइड आणि इतर रासायनिक पदार्थ मिसळले जातात. हे पदार्थ आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असून, यामुळे मळमळ, गॅस्ट्रोएन्टेरायटिस, यकृताचे आजार आणि मूत्रपिंडाचे आजार यांसारख्या गंभीर समस्या उद्‌भवू शकतात. तर, मिठाईत कृत्रिम रंग, खवा, दूध, तांदळाचे पीठ आणि ॲल्युमिनियम फॉइल मिसळले जाते, जे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जास्त रंगीत, हाताला रंग लागणारी किंवा चिकट पदार्थ असलेली मिठाई टाळावी, अशा भेसळयुक्त पदार्थांमुळे ग्राहकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण होतो.

## अपघातात तिघे जण जखमी

**पनवेल:** कोन गाव ते पळस्पे जाणाऱ्या रस्त्यावरील डेरवली रेल्वे पुलाखाली एका टँकरने स्कुटीला पाठीमागून धडक दिली. या धडकेत स्कुटीचालक म्यानुअल जाओ डिकोस्टा (६३) हे जखमी झाले आहेत. तर, दुसऱ्या घटनेत मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा पक्षी अभयारण्य खिंडीत विजय कदम यांनी आपल्या ताब्यातली रिक्षा थांबवली. दरम्यान, अचानक पाठीमागून आलेल्या कारने विजय कदम यांच्या रिक्षाला जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षात बसलेला कदम यांचा मुलगा विवेक आणि पुतणी अपर्णा हे गंभीर जखमी झाले आहेत.

**आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार** | **न्यूयॉर्क येथील नॅशनल आर्ट्स क्लबमध्ये होणार सन्मान**

# पराग बोरसे यांना ‘यांग फॅमिली’ पुरस्कार

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**कर्जत येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार पराग बोरसे यांनी पुन्हा एकदा भारताचा गौरव वाढवला आहे. अमेरिकेतील पॅस्टेल सोसायटी ऑफ अमेरिका आयोजित वार्षिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनामध्ये त्यांच्या ‘एनड्युरींग ब्रीलीयन्स’मधील ‘फोल्क लेजन्सी’ या चित्राला प्रतिष्ठित ‘यांग फॅमिली’ पुरस्कार मिळाला आहे.**



पुरस्कारप्राप्त चित्र ‘फोल्क लेजन्सी’ हे महाराष्ट्रातील एका मेंढपाळाचे प्रभावी व्यक्तिचित्रण आहे. केशरी पागोटे, चेहऱ्यावरचे सुरकुत्या, थोडासे पांढरट दाढीचे केस आणि भावपूर्ण नजर या सर्व तपशीलातून त्याच्या आयुष्याचा अनुभव व परंपरेचे सौंदर्य अधोरेखित केले आहे. हे चित्र सॉफ्ट पॅस्टेल्स ऑन सॅन्डेड पेपर या माध्यमात साकारले आहे. पॅस्टेल सोसायटी ऑफ अमेरिका ही पॅस्टेल कला क्षेत्रातील सर्वांत जुनी व प्रतिष्ठित संस्था आहे. यावर्षीचे पुरस्कार परीक्षक म्हणून केरी मॅक वेबर, कार्यकारी संचालक फेअरफिल्ड युनिव्हर्सिटी आर्ट म्युझियम, कनेक्टिकट, अमेरिका यांनी निवड केली.

हा पुरस्कार पराग बोरसे यांना १९ सप्टेंबर रोजी न्यूयॉर्क येथील नॅशनल आर्ट्स क्लब येथे प्रदान केला जाणार आहे. ही बोरसे यांची सलग दुसरी कामगिरी आहे. गेल्या वर्षी त्यांनी याच प्रदर्शनात ‘फ्लोरा बी. गफिन’ पुरस्कार जिंकला होता. बोरसे यांना अमेरिकेतील पॅस्टेल सोसायटी ऑफ द वेस्ट कोस्ट कडून दोन वेळा सन्मानित करण्यात आले आहे. २०१८ मध्ये त्यांना संस्थेचा सर्वोच्च ‘साऊथवेस्ट आर्ट मॅगझिन’ पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय पोर्ट्रेटसाठी ‘ब्रॉन्झ’ पुरस्कार देखील मिळाला आहे. अमेरिकेतील प्रतिष्ठित ‘द पेस्टल जर्नल’ मासिकाने त्यांना जगातील पाच सर्वोत्तम पॅस्टेल कलाकारांपैकी एक म्हणून घोषित केले आहे.

> **माझ्या कलाकृतीतून भारतातील ग्रामीण जीवनाचे चेहरे आणि कथा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न मी नेहमीच करत आलो आहे. हा पुरस्कार माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.**
> **- पराग बोरसे, चित्रकार**





आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

**फोटोसाठी स्थानिक संपर्क**

सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६
जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/८१४९६६३८१३
संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९००
समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१
मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९
अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४
नंदकुमार मरवडे (खांब) : ८३०८६८८२२९
सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९
सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२
समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५
दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५
जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२
शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५
कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९
राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/८२३७१३८९७४
मुस्कान खान (पेण) : ८९२८९११३९१
राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५
बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४
भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८
सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१
अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३
गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३
वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५
अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७
सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७
महेश पवार (नागोठणे) : ९२२५४७००३७

**स्पर्धेचे स्वरुप**
■ आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला ‘कृषीवल’मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
■ स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

# स्वस्ताई होत असताना..

पूर्वी केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर झाला की काय महाग व काय स्वस्त झाले याची लोकांना उत्सुकता असे. हजारो कोटींचे बाकीचे आकडे आणि योजना सामान्य माणसासाठी लांबच्या आणि गैरमतलबाच्या असत. जीएसटी लागू झाल्यापासून अमुक महागणार वगैरे बातम्या बंद झाल्या. अर्थसंकल्पात कर कमी किंवा जास्त होणे संपले. सर्व राज्यांचे अर्थमंत्री सदस्य असलेल्या जीएसटी कौन्सिलमध्ये याबाबत चर्चा होऊ लागली. अंतिम निर्णय केंद्र सरकारच घेत असले तरी कौन्सिलच्या बैठकांनुसार ते होऊ लागले. त्याचनुसार बुधवारी झालेल्या बैठकीनंतर जीएसटी दरामध्ये मोठे बदल जाहीर करण्यात असून देशात निदान मध्यमवर्गासाठी तरी एक नवी स्वस्ताई अवतरणार आहे. आजवर जीएसटीचे ५,१२,१८ व २८ टक्के असे चार स्तर किंवा स्लॅब्ज होते. आता केवळ ५ व १८ टक्के असे दोनच स्तर राहणार आहेत. १२ व २८ टक्के हा दर काढून टाकण्यात आला आहे. सिगारेट्स, दारू, उंची गाड्या अशा वस्तूंवर ४० टक्के कर लागू राहील. रोजच्या वापरातल्या अनेक वस्तूंवरचा कर शून्य टक्के करण्यात आला आहे. हे नवे दर घटस्थापनेपासून म्हणजे २२ सप्टेंबरपासून लागू होणार असून त्यामुळे सामान्य लोकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. अर्थात, कराच्या कमी झालेल्या दराच्या प्रमाणात व्यापाऱ्यांनी वस्तू स्वस्त केल्या तरच हा फायदा होणार आहे. मात्र तो होईल अशी सरकारची अपेक्षा आहे. येणाऱ्या नवरात्र व दिवाळीच्या सणामध्ये लोक अधिकाधिक खरेदी करतील व अर्थव्यवस्थेला आणखी चालना मिळेल अशी सरकारची अपेक्षा आहे. अर्थात मोदी सरकारच्या डोक्यात कायम निवडणुकांची किटकिट वाजते असते व त्यानुसारच बरेच निर्णय होत असतात. त्यामुळे आगामी बिहार, बंगाल व इतर राज्यांच्या निवडणुकांचा विचार यात नक्कीच आहे. पनीर, दूध, छेना किंवा रोटी, चपाती इत्यादींवरचा कर शून्य टक्क्यांवर आणणे इत्यादीचा त्या राज्यांमध्ये थोडाफार फायदा होऊ शकेल.

## मध्यमवर्गीयांवर लक्ष

रोजच्या वापरातील बऱ्याच वस्तूंवर बारा किंवा अठरा टक्के कर होता. तो कमी करण्याची मागणी अनेक दिवसांपासून चालू होती. पण सरकारने दाद दिली नव्हती. अगदी कोविड काळातही ते कर कमी करण्यात आले नव्हते. आता मात्र केसांना लावण्याचे तेल, शाम्पू, साबण, टूथपेस्ट, दाढीचा साबण, लोणी, तूप, चीज, श्रीखंड वगैरे दुधाचे पदार्थ इत्यादींवरचा कर पाच टक्के इतका खाली आणण्यात आला आहे. साखरेच्या मिठाया, चॉकलेट्स, केक, बिस्किटे, बेकरी पदार्थ, आईस्क्रीम्स, फरसाण, भुजिया हेही या यादीत आहेत. म्हणजे या वस्तू किमान सात ते तेरा टक्क्यांनी स्वस्त होतील अशी अपेक्षा आहे. मध्यमवर्गीयांना हा मोठाच दिलासा असेल. शाळेची पुस्तके, वह्या यांच्यावरचा कर शून्यावर आणण्यात आला आहे. हा निर्णय शाळा व कॉलेजे सुरू होण्यापूर्वी झाला असता तर त्याचा फायदा अधिक झाला असता. पण आता होणारा लाभही कमी नसेल. मध्यम स्तरातील शेतकऱ्यांनाही स्वस्ताई चाखता येऊ शकेल. कारण, ट्रॅक्टर्स व ठिबक सिंचन यंत्रणांवरचा कर बारा टक्क्यांवरून पाच टक्के करण्यात आला आहे. जैविक खते आणि सूक्ष्मद्रव्ये यांच्यावरचा करही असाच कमी झाला आहे. आरोग्यविमा व आयुर्विमा यांच्या वार्षिक प्रीमियमवर आजवर अठरा टक्के कर लागू होता. यावर वारंवार टीका झाली होती. एकीकडे देशात विम्याचा पुरेसा प्रसार झालेला नाही असे खंत खुद्द सरकारच व्यक्त करीत असते. दुसरीकडे विम्याच्या प्रीमियमवर तब्बल १८ टक्के जीएसटी होता. म्हणजे हजार रुपयांचा प्रीमियम भरायचा असेल तर १८० रुपये कर म्हणून द्यावा लागत होता. हा कर आता शून्य टक्के करण्यात आला आहे. याखेरीज एअर कंडिशनर्स, टीव्ही, चारचाकी गाड्या, रिक्षा व मोटारसायकली यांच्यावरचा आजवरचा २८ टक्के जीएसटी आता १८ टक्क्यांवर आणला जाणार आहे. त्यामुळे त्याही वस्तू थोड्याफार स्वस्त होऊ शकतील. इस्पितळात वापरायच्या वस्तू तसेच घरगुती वापराची भांडी हीदेखील स्वस्त होणार आहेत. सिमेंटवरचा कर २८ वरून १८वर आल्याने बिल्डर मंडळींचा फायदा होणार आहे.

## लोक खरेदीसाठी येणार?

बारकाईने पाहिल्यास हे सर्व निर्णय मध्यमवर्गीयांना सुखावणारे आहेत. या सर्व वस्तू दैनंदिन वापराच्या नाहीत. अनेकजण तर त्या तातडीने खरेदी करण्याच्या अवस्थेतही नसतील. तरीही आपल्याला हव्या असलेल्या वस्तूंवरचा कर सरकारने कमी केला आहे याचा आनंद त्यांना वाटेल. सरकारचा तोच तर हेतू आहे. मात्र करकपातीचा फायदा सामान्य ग्राहकांपर्यंत फारच कमी वेळा पोचतो असा पूर्वापारचा अनुभव आहे. उदाहरणार्थ सिमेंटच्या करात कपात झाली म्हणून घरांच्या किमतीमध्ये काही हजार रुपये कमी झाले असेदेखील घडत नाही. त्यासाठी सरकारला व्यापारी व दलाल मंडळींवर दट्ट्या आणावा लागेल. भाजपवाल्यांचे व्यापारी जैन, मारवाडी, गुजराती लॉबीशी असलेले सख्य पाहता हे किती घडेल याविषयी शंका आहे. दुसरीकडे कर कमी करण्यात आल्यामुळे सरकारकडचे जमा उत्पन्न मात्र नक्की कमी होणार आहे. हे नुकसान नेमके किती आहे हे सांगण्यात आलेले नाही. विरोधी राज्य सरकारांच्या अर्थमंत्र्यांनी याबाबत चिंता व्यक्त केलेली असून नुकसान ८० हजार कोटी असावे असा अंदाज केला आहे. तर सरकारच्या म्हणण्यानुसार ते ४८ हजार कोटी रुपये असावे. या आकड्यालाही नुकसान असे थेट न म्हणता करकपातीचा परिणाम असे म्हटले गेले आहे. पोपट मेला आहे हे थेट न सांगण्याची मोदी सरकारची ही नेहमीची चालबाजी आहे. सध्या जीएसटीचा कर केंद्राकडे जमा होतो व त्या पैशांतून राज्यांना त्यांचा वाटा दिला जातो. राज्यांना दारु आणि पेट्रोलवरील कर वगळता आता उत्पन्नाचे कोणतेही साधन उरलेले नाही. अशा स्थितीत राज्यांवर अन्याय होणार नाही हे पाहावे लागेल. करांमध्ये कपात झाली की मध्यमवर्ग अधिक खरेदीसाठी बाजारात उतरेल व एकूणच आर्थिक चलनवलन वाढेल अशी केंद्राची अपेक्षा आहे. पण मुळात ट्रम्प यांच्या आयातशुल्काच्या बडग्यामुळे कपडे, हिरे, शेतमाल यामधील अनेकांचे रोजगार गेले आहेत. आयटीच्या क्षेत्रातही मंदी आहे. सरकारी जागा भरल्या जात नाहीत. या स्थितीत आहे तो पैसा वाचवून ठेवण्याकडेच लोकांचा कल असतो. म्हणजे ही जी काही स्वस्ताईची लाट येणार आहे तिच्यात किती लोक आंघोळ करायला तयार आहेत हा खरा प्रश्न आहे. स्वदेशी उत्पादनांचा खप वाढावा हाही या करकपातीमागचा हेतू आहे. पण आता आपली चीनसोबत नवी दोस्ती झाल्यानंतर तिकडच्या वस्तू आणखी स्वस्त होऊन भारतात दाखल होण्याची शक्यता वाढली आहे. याचा सामना कसा करणार?

---

**विचार**

# 'ऑनलाईन गेमिंग'वर अखेर अंकुश

***भारतात ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून कोट्यवधी कुटुंबे दर वर्षी वीस हजार कोटी रुपये गमावतात. 'ऑनलाईन गेमिंग'मध्ये हरल्याने काहीजण सर्वस्व गमावतात. कुटुंबे उद्‌ध्वस्त होतात. सरकारने त्यावर बंदी घालणारे विधेयक मंजूर केले, हे चांगले झाले. अर्थात या खेळांचे बहुविध रुप पाहता या विधेयकामुळे काही कौशल्यांकडे आणि व्यापारी तरतुदींकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी आहेत. या निमित्ताने घेतलेला वेध.***



**शिवाजी कराळे**

केंद्र सरकारने संसदेत 'ऑनलाइन गेमिंगचा प्रचार आणि नियमन विधेयक' मंजूर केले. राष्ट्रपतींची सही झाल्यानंतर ते कायद्यात रुपांतरित होईल. या विधेयकानुसार 'ई-स्पोर्टस' आणि 'सोशल गेम्स'ना प्रोत्साहन दिले जाईल, तर 'ऑनलाइन मनी गेम्स'वर पूर्णपणे बंदी घातली जाईल. गेम्सची मदत घेऊन कोणतीही व्यक्ती ऑनलाइन बेटिंग करू शकणार नाही. सरकारचा विश्वास आहे की असे ऑनलाइन गेम केवळ व्यक्ती आणि कुटुंबांनाच नुकसान पोहोचवत नाहीत, तर 'मनी लाँड्रिंग', करचोरी आणि दहशतवादाच्या निधीशीदेखील जोडले जातात. बरेच लोक फक्त मनोरंजनासाठी ऑनलाइन जुगार खेळण्यास सुरुवात करतात; परंतु नंतर त्यांना त्याचे व्यसन लागते. सरकारने ऑनलाइन गेमिंगचे तीन प्रकार केले आहेत. पहिली श्रेणी 'ई-स्पोर्टस', दुसरी श्रेणी 'ऑनलाइन सोशल गेम्स' आणि तिसरी श्रेणी 'ऑनलाइन मनी गेम्स'. 'ऑनलाइन सोशल गेम्स'च्या मदतीने मुले काही तरी शिकतात. या गेममध्ये काही सबस्क्रिप्शन द्यावे लागू शकते; परंतु त्या बदल्यात पैसे जिंकण्याची अपेक्षा नसते. 'पब्ज' हा दक्षिण कोरियाची व्हिडीओ गेम कंपनी 'ब्लूहोल'ने तयार केले आहे. 'पब्ज' मध्ये अनेक खेळाडू एकत्रितपणे व्हर्च्युअल नकाशावर उतरतात आणि शेवटपर्यंत टिकतो तो विजेता बनतो. 'फ्री फायर'देखील 'पब्ज' सारखाच आहे. यात जलद आणि लहान सामने असतात. 'जीटीए' हा एक ॲक्शन-ॲडव्हेंचर गेम आहे. यामध्ये खेळाडू शहरात फिरून मिशन पूर्ण करू शकतात. वेगवेगळी वाहने चालवू शकतात. या गेममध्ये थेट पैसा धोक्यात नाही. येथे एखादी व्यक्ती व्हर्च्युअल पद्धतीने बंदुका, कपडे किंवा इतर वस्तू खरेदी करू शकते; परंतु येथे पैसे गुंतवून पैसे जिंकण्यात काही अर्थ नाही.

ताज्या विधेयकाच्या कलम २ (जी) नुसार खेळाडू फी, पैसे किंवा हिस्सा लावून त्या बदल्यात पैसे किंवा इतर बक्षिस जिंकत असल्यास बंदी घातली जाईल. कायदा झाल्यानंतर लोक फँटसी स्पोर्ट्स गेम, ऑनलाइन रमी, कार्ड गेम, पोकर प्लॅटफॉर्म आणि ऑनलाइन टीम तयार करून थेट पैसे गुंतवले जाणारे गेम खेळू शकणार नाहीत. 'ऑनलाइन मनी गेम'मध्ये दोन घटक आहेत. एक म्हणजे चान्सचा खेळ (जुगार) आणि दुसरा म्हणजे कौशल्याचा खेळ. 'ऑनलाइन मनी गेम'शी संबंधित कंपन्या 'कौशल्याचा खेळ' असा युक्तिवाद करुन निर्बंधांपासून सुटतात. सरकारने आणलेल्या विधेयकात चान्सचा खेळ (जुगार) आणि कौशल्याचा खेळ परिभाषित केलेले नाही.' विधेयकानुसार, केंद्र सरकार ऑनलाइन गेमिंग प्राधिकरणदेखील तयार करेल. त्याचे काम कोणता गेम पैशाचा खेळ आहे आणि कोणता 'ई-स्पोर्टस' आहे हे ठरवणे असेल. याशिवाय प्राधिकरण सामाजिक आणि 'ई-स्पोर्टस'ची नोंदणीदेखील करेल तसेच नियम आणि मार्गदर्शक तत्त्वेदेखील तयार करेल. जगात 'पब्ज' खेळणाऱ्यांपैकी सुमारे २५ टक्के लोक भारतात आहेत. अनेक सेलिब्रिटी क्रिकेटपटू आणि चित्रपट तारे आजकाल ऑनलाइन पैशाच्या खेळांचा प्रचार करत आहेत. 'इंडियन प्रीमियर लीग' (आयपीएल) संघांच्या जर्सीवरही त्याचा प्रचार केला जात आहे. इतक्या मोठ्या जाहिरातीमुळे ऑनलाइन गेमिंगची लोकप्रियता वाढली आहे असे तज्ज्ञांचे मत आहे.

नव्या विधेयकानुसार कोणतीही व्यक्ती ऑनलाइन पैशाच्या खेळांशी संबंधित जाहिराती तयार करू शकत नाही किंवा त्यात मदत करू शकत नाही. एखाद्या व्यक्तीने असे गेम खेळण्याचा प्रचार केल्यास दोन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा ५० लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. नवीन तरतुदींनुसार ऑनलाइन गेमचा प्रचार करणाऱ्या सेलिब्रिटी आणि प्रभावकांना तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. भारताच्या 'मनी लाँडरिंग' विरोधी कायद्यांतर्गत सेलिब्रिटी आणि प्रभावकांवरही खटला दाखल केला जाऊ शकतो. विधेयकाच्या कलम ११ नुसार 'ऑनलाइन मनी गेम' चालवणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याची तरतूद आहे. एखाद्या कंपनीने 'ऑनलाइन मनी गेम' ऑफर करून कायदा मोडल्यास त्या कंपनीच्या संचालक, व्यवस्थापक आणि अधिकाऱ्यावर खटला दाखल केला जाईल. विधेयकानुसार, कंपनीच्या स्वतंत्र संचालकावर कोणताही खटला चालणार नाही, कारण ते दैनंदिन निर्णयांमध्ये सहभागी नसतात. विधेयकाचा उद्देश गुन्ह्याच्या प्रकरणात कंपनीच्या खऱ्या जबाबदार लोकांना पकडणे आहे. या विधेयकात ऑनलाइन पैशाचे गेम खेळणाऱ्यांना गुन्हेगारांऐवजी बळी मानले जाते. विधेयकानुसार असे करणारी व्यक्ती दोषी नाही आणि त्याचा उद्देश अशा लोकांना संरक्षण देणे आहे. शिक्षा फक्त पैसे लावून खेळ ऑफर करणाऱ्या आणि प्रोत्साहन देणाऱ्यांनाच दिली जाईल. विधेयकाच्या कलम १(२) नुसार हा कायदा परदेशातून चालणाऱ्या प्लॅटफॉर्मनाही लागू होईल. अनेक फँटसी स्पोर्टस, बेटिंग, कॅसिनो प्लॅटफॉर्म परदेशातून चालत आहेत. विधेयक लागू होताच सरकार अशा प्लॅटफॉर्मना ब्लॉक करू शकते. विधेयकाच्या कलम ७ नुसार, बँका ऑनलाइन गेम खेळण्यासाठी पेमेंट ॲप्स किंवा वॉलेट वापरू शकणार नाहीत. कायदा लागू झाल्यानंतर अशा संस्था किंवा कंपन्या ऑनलाइन मनी गेममध्ये पैसे जमा करण्याची किंवा काढण्याची सुविधा देऊ शकणार नाहीत. या विधेयकामुळे अडचणीमध्ये येणाऱ्या काही उद्योगांच्या मते भारतातील दोन लाख कोटी रुपयांचा 'स्किल गेमिंग' उद्योग उद्‌ध्वस्त होऊ शकतो. त्यांनी सरकारकडे या उद्योगावर बंदी घालण्याऐवजी नियमन करण्याची मागणी केली आहे. 'गेमिंग' उद्योगाची बाजारपेठ दर वर्षी तीस हजार कोटी रुपयांची आहे. त्यातून सरकारला २० हजार कोटी रुपयांचा कर मिळतो. असे असले, तरी सरकारला मिळालेल्या महसुलापेक्षा त्यातून होणारे नुकसान जास्त आहे. सुमारे दोन लाख लोक या उद्योगाशी संबंधित आहेत. अंदाजानुसार, २०२० मध्ये देशात गेमर्सची संख्या ३६ कोटी होती. २०२४ मध्ये ती ५० कोटी झाली आहे. येत्या काळात जगात गेमर्सची संख्या ५० कोटींनी वाढेल. २०३० पर्यंत जागतिक गेमिंग उद्योग ६६ हजार कोटी रुप्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. भारतात ऑनलाइन गेमिंग उद्योगाचा विकास दर दर वर्षी ३२ टक्के इतका आहे. तो जागतिक ऑनलाइन गेमिंगपेक्षा अडीचपट जास्त आहे. सरकारने नियमन केले असले, तरी यात गुंतलेले लोक बेकायदेशीर जुगार प्लॅटफॉर्म आणि ऑपरेटरकडे वळू शकतात. या निर्णयामुळे सुमारे दोन लाख नोकऱ्या, २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि २० हजार कोटी रुपयांच्या वार्षिक जीएसटी संकलनाला मुकावे लागेल. आजच्या काळात अनेक राज्य आणि शहर स्तरावरील स्पोर्टस लीग आपल्या अस्तित्वासाठी न्सरकारी नियमांवर अवलंबून असतात. हे क्षेत्र संपल्यास भारतीय क्रिकेट आणि इतर खेळांसाठी प्रतिभेची उपलब्धता कमकुवत होऊ शकते. कायदा प्रतिबंधात्मक असल्यास काही प्लॅटफॉर्म आपले कामकाज परदेशात हलवू शकतात. राष्ट्रपतींकडून मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक कायद्याचे रूप घेईल. ऑनलाइन गेमिंग विधेयकाचा मुख्य उद्देश 'ई-स्पोर्ट्स' आणि सोशल गेम्सना प्रोत्साहन देणे आहे. 'ई-स्पोर्ट्स'ना आता भारतात अधिकृत खेळाचा दर्जा मिळेल. क्रीडा मंत्रालय आता 'ई-स्पोर्ट्स'साठी नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी करेल. यासोबतच यासाठी प्रशिक्षण अकादमी आणि संशोधन केंद्र स्थापन केले जाईल. राष्ट्रीय क्रीडा धोरणात 'ई-स्पोर्ट्स'चा समावेश करण्याची आणि खेळाडूंसाठी प्रोत्साहन योजना राबवण्याची तयारी सुरू आहे. ऑनलाइन गेमिंग विधेयकात स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे की देशात कोणत्याही प्रकारचे ऑनलाइन जुगार, सट्टेबाजी आणि रिअल मनी गेम खेळण्यास परवानगी दिली जाणार नाही. बँका आणि वित्तीय संस्थांना अशा गेमशी संबंधित व्यवहारांवर बंदी घालावी लागेल. माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० अंतर्गत हे प्लॅटफॉर्म ब्लॉक केले जातील. व्यसन, आर्थिक नुकसान, फसवणूक आणि मनी लाँडरिंगसारख्या समस्यांपासून संरक्षण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

---

**चर्चा आजची**

# राजाच्या दरबारात भेदभाव!

**राकेश लोहार**

सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. मुंबईतील लालबाग राजाच्या दर्शनाला देशभरातून लाखो भाविक येत असतात. मात्र, अनेकदा आपण त्या ठिकाणी सामान्य नागरिकांना अपमानास्पद वागणूक दिली जाते, हे पाहायला मिळते. व्हीआयपी लोकांना सन्मानपूर्वक वागणूक आणि सामान्य नागरिकांना अपमानास्पद वागून, धक्काबुक्की करण्यात येत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. लालबाग राजाच्या दरबारात मंडळाच्या कार्यकर्त्यांचा मुजोरपणा सातत्याने दिसून येत आहे. भाविकांना धक्काबुक्की करणे, मानगुटीला धरुन बाजूला काढणे असे अनेक प्रकार मंडळाचे लोक करताना दिसून येत आहेत. गणेशभक्तांना दिल्या जाणाऱ्या चुकीच्या वागणुकीसंदर्भात चीड व्यक्त करण्यात येत आहे. कारण, देवाच्या दरबारात सर्वांना समान वागणूक मिळणे अपेक्षित आहे. एकीकडे सर्वसामान्यांच्या बखोटे पकडून भाविकांना धक्के देत सुरक्षारक्षकांची सर्रास मुजोरी सुरूय. तर, दुसऱ्या बाजूला धनदांडग्यांसाठी लालबागच्या राजा गणेश मंडळाकडून पायघड्या घातल्या जात आहेत. मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून सुरू असणारा हा प्रकार संताप आणणारा असून, खरं तर लालबागच्या राजाला तरी हे आवडत असेल का? देवभोळे, श्रद्धाळू भक्त राजाची एक छबी आपल्या डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी, त्याचा आशीर्वाद आपल्याला मिळावा यासाठी राजाच्या दरबारात श्रद्धेने जात आहे. परंतु, मंडळाच्या कार्यकर्त्यांची मुजोरी पाहता, सर्वसामान्यांसाठी धक्काबुक्की, तर राजकारणी आणि धनिकांसाठी पायघड्या घालत असल्याचे दिसून येत आहे. हे कुठेतरी थांबायला हवेय. गणराया, आधी या कार्यकर्त्यांनाच सद्‌बुद्धी दे, येणारा भक्त श्रीमंत किंवा गरीब अशी तुलना न करता सर्वांना सारखीच वागणून मिळावी, एवढी अपेक्षा आहे. परंतु, गेली कित्येक वर्षे हे असेच सुरू आहे. याला कुठेतरी लगाम लागावा, अशी भावना आहे.

लालबागच्या राजाचं दर्शन घेण्यासाठी राज्य आणि देभरातून लाखो भाविक येत असतात. हे भाविक आठ ते दहा तास रांगेत थांबतात. मात्र, या भाविकांना मंडपात सुरक्षारक्षकांच्या मुजोरीचा सामना करावा लागतो. त्यामुळेच बाप्पा तुझ्या मंडपात फड असेच म्हणायची वेळ भाविकांवर आली आहे. त्यामुळे लालबागच्या राजा गणेश मंडळाने ही मुजोरी थांबवायला हवी. कारण, ही मुजोरी खुद्द बाप्पालाही आवडणार नाही. लालबागच्या राजाची नवसाला पावणारा बाप्पा अशी ख्याती आहे. लालबागच्या राजाचा महिमा आणि दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. लालबागमध्ये पदाधिकाऱ्यांकडून होणाऱ्या या वर्तनाची ही काही पहिली वेळ नाही. यापूर्वी अनेकदा पदाधिकारी-पोलीस, पदाधिकारी-पत्रकार आणि काही पदाधिकारी-भाविक यांच्यात झालेल्या बाचाबाचीची अनेक उदाहरणे समोर आलेली आहेत. 'जिथे प्रमाणाबाहेर गर्दी होते, तिथे प्रमाणाबाहेर तणावही निर्माण होतो' असे मंडळाच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. परंतु, आपण काय करतो, कसे वागतो, याचं भानदेखील या कार्यकर्त्यांना असावे, एवढीच अपेक्षा.

दोन महिने आधी होणारा पाद्यपूजन सोहळा, त्यानंतर प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून होणारे लालबागच्या राजाच्या मूर्तीचे मुखदर्शन, राजाच्या दानपेटीत केले जाणारे दान, दर्शनासाठी तासन्‌तास रांगेत उभं राहावे लागणे, मुंबईच्या महत्त्वाच्या भागातून वाजतगाजत निघणारी मिरवणूक, दुसऱ्या दिवशी पहाटे सर्वांत शेवटी होणारे विसर्जन आणि राजाच्या चरणी अर्पण केलेल्या वस्तूंचा लिलाव या सर्व गोष्टींमुळे लालबागचा राजा चांगलाच प्रसिद्धीला आला आहे. नवसाला पावणारा राजा अशी ख्याती असल्यामुळे अलीकडच्या काळात राजकारणी, खेळाडू, सामाजिक क्षेत्रातील मंडळी राजाच्या चरणी नतमस्तक होत असल्यामुळे सामान्य भाविकही राजाच्या दर्शनासाठी गर्दी करु लागले आहेत. परंतु, येथे होणाऱ्या भेदभावामुळे कशाला जायचे राजाच्या भेटीला, त्याचे दर्शन घ्यायला? अशी सामान्य भक्तांच्या मनाची घालमेल नक्कीच होत आहे. कारण, बाप्पाला न आवडणाऱ्या श्रद्धेचा येथे बाजार मांडला असल्याचेही म्हटले जात आहे. श्रीमंतांना व्हीआयपी ट्रीटमेंट राजाच्या मंडपात दिली जात असताना, सर्वसामान्यांना मात्र आठ-दहा तास दर्शनासाठी रांगेत उभे राहूनही शेवटी धक्के खात बाहेर पडावे लागत आहे. यावरुन एक बाब निश्चित जाणवते. ती म्हणजे, याठिकाणी भक्ताच्या श्रद्धेला नाही, तर श्रीमंतीला किंमत आहे. तुम्ही श्रीमंत असाल तर तुम्हाला सेल्फी काढायला आणि त्याचबरोबर तुमचा सत्कारही केला जातोय. हे सारं आज लाईव्ह प्रक्षेपणाच्या माध्यमातून दिसून येत आहे. त्यामुळे याबाबतचे सत्य कुणी सांगण्याचे किंवा लपवण्यासारखे असे काही नाही. चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती असणारा बाप्पा आज मुजोर कार्यकर्त्यांमुळे नाहक बदमान होत आहे. लोक श्रद्धेने येत आहेत, त्यांच्या श्रद्धेशी, भावनांशी न खेळता त्यांचा आदर करायला शिकावे, असेच मनोमन वाटते. म्हणूनच, बाप्पाला एवढेच सांगणे असेल, सर्वांवरील विघ्ने, संकटे दूर तर तू करच. परंतु, मुजोर कार्यकर्त्यांना चांगले वागण्याची सद्‌बुद्धी दे!

---

**लोकसंसद**

## "डॉ. राधाकृष्णन यांच्या विचाराची त्रिसूत्री ...."

५ सप्टेंबर ... हा दिवस देशभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे माजी राष्ट्रपती व थोर तत्वज्ञ तसेच प्राध्यापक डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा हा जन्म दिवस. त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी झाला. वयाच्या केवळ १५ व्या वर्षी त्यांनी मॅट्रिक ची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर त्यांनी तत्वज्ञान व नीतिशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणून कामही केले. जगातील नामवंत ऑक्सफर्ड विद्यापीठात सुद्धा ते काही काळ प्राध्यापक होते. आंध्र व बनारस हिंदू विद्यापीठाचे ते कुलगुरू होते. राष्ट्रसंघात त्यांनी १९३१ ते १९३९ या काळात प्रतिनिधित्व केले. स्वतंत्र; भारताचे पहिले उपराष्ट्रपती म्हणून त्यांनी १९५२ ते १९६२ असे काम केले. एका तत्ववेत्याची एका राष्ट्राचा प्रमुख म्हणून नेमणूक झाली होती. १९६२ ते १९६७ या काळात ते भारताचे राष्ट्रपती होते. एका शिक्षकाला हा बहुमान मिळाला होता हे भारतात प्रथमच घडत होते. शिक्षकांच्या प्रति आदर म्हणून हा दिवस सर्व भारतभर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. राधाकृष्ण यांच्या विचाराची त्रिसूत्री अतिशय महत्वाची आहे. नीतिमान पण चिकित्सक, विज्ञानोमुख पण अध्यात्म प्रवण अशा शिक्षणाचा प्रयोग कसा करता येईल? प्राचीन भारताचे तत्वज्ञान सर्व जगाला अधिनिक भाषाशैलीत कसे समजावून सांगता येईल? व मानव जातीचे भवितव्य घडविण्यासाठी सांस्कृतिक संचिताचा उपयोग किती? हे ती त्रिसूत्री होय. भारत सरकारने त्यांना भारत रत्न देऊन १९५४ साली गौरव केला होता प्रत्येकाच्या आयुष्यात माता पित्यानंतर शिक्षकाचे स्थान असते. संस्काराचा ठेवा शिक्षकच मुलांना देतात. शिक्षक केवळ शिकवत नाही तर आयुष्य व व्यक्तिमत्व घडविण्याचे काम सुद्धा करतात. संस्कारमय पिढी घडवण्याचे काम शिक्षक करतात. हे शिक्षकाचे ऋण मान्य केलेच पाहिजे. आयुष्याला वळण देणारा एका थोर घटक म्हणून समाजाने शिक्षणाच्या प्रति पाहिले पाहिजे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात शिक्षकांविषयी आदरभाव वाढविणे व त्यांना सन्मान देणे हीच आजच्या काळाची गरज आहे आज या दिनाच्या निमित्ताने भारत सरकारचे शिक्षण खाते उत्कृष्ट शिक्षकांचा सत्कार करते तसेच राज्य सरकारतर्फे सुद्धा शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविले जाते.

**– शांताराम वाघ, पुणे**

---

**दिनविशेष**

# जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक- शिक्षक दिन!

आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील.

आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यम वर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

CIDCO
WE MAKE CITIES

# जाहीर सूचना

**विषय: नवी मुंबई प्रकल्पाकरीता संपादित जमिनीपोटी इरादित भूखंडाचे वाटप व भाडेपट्टा करारनामा निष्पादित करणेबाबत.**

१. राज्य शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित क्षेत्राच्या उभारणीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ अन्वये सिडको महामंडळास "नवनगर विकास प्राधिकरण" म्हणून घोषित केले आहे. नवी मुंबई प्रकल्पाकरीता जमीन संपादनासाठी निश्चित केलेल्या २२.५% विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत, नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिकारीतेत सिडको महामंडळाच्या स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अन्वये जमीन संपादित केली आहे.

२. जिल्हाधिकारी, रायगड व सिडको महामंडळाच्या स्तरावर २२.५% विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत जमीनधारकांनी जमीन संपादनाबाबत दिलेल्या संमतीपत्रांच्या आधारे जमीन संपादनाचे अंतिम संमती निवाडे घोषित करण्यात आले आहेत व त्याआधारे **दि.१८.०७.२०२५** रोजी संगणकीय सोडतीद्वारे पात्रताधारक जमीनधारकांना पुष्पक नोड उलवे येथील **सेक्टर क्र. २७, २८, २९ व ३०** येथे भूखंड इरादित करण्यात आले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

## परिशिष्ट

| अनु. क्र. | संचिका क्र. | भूधारकांचे नाव | गाव | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | क्षेत्र | सेक्टर | भूखंड क्र. | पात्रता (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५७/LP | सुशील किशनचंद काकु | बेलोंडेखार | ९४/१२ | ०-०३-०० | २७ | ३५/१ | ५० |
| २ | ३२०/LP | वामन काशिराम हातगे | बेलोंडेखार | ७/६ पै | ०-०३-०० | २७ | ३२/१ | ५० |
| ३ | ७५/DRN | विजयभान गुप्ता | चाणजे | ३६९/१/अ/१ पै. | ०-०४-० | २७ | ३५ | ७० |
| ४ | २५१/LP | प्रल्हाद माणिक मढवी | बेलोंडेखार | ५६/१ पै | ०-०४-७० | २७ | ३२A | ८० |
| ५ | २४३/LP | अजित तानाजी अदाते व अनुजा अजित अदाते | चिरले | ६७/१० | ०-०६-०० | २७ | ६१B | १०० |
| ६ | १८५/LP | रविंद्र वि. पिंजरकर | गावठाण | ३५/१ ब | ०-०६-६० | २७ | ६६ | ११० |
| ७ | १२१/NM | बाबुराम वर्मा | गव्हाण | २८३/० | ०-०७-०० | २७ | ६१A | ११० |
| ८ | १५१/LP | जावेद इस्माइल खान व इतर | बेलोंडेखार | १०७/१ | ०-०९-०० | २७ | ३९/A | १५० |
| ९ | १२/LP+ ३०३/LP | पंकज दत्ता व इतर | जांभूळपाडा<br>बेलोंडेखार | ३५/८<br>२१/६ पै | ०-०८-००<br>०-०३-०० | २७ | ३९ | १८० |
| १० | २४४/LP | रुपेश शंकर कोकाटे व इतर | बेलोंडेखार | ४२/२ | ०-११-९३ | २८ | ८९ | १९० |
| ११ | २१३/LP | मंगलदास कापडे व इतर | जांभूळपाडा | ९/२ | ०-१२-०० | २८ | ८८ | १९० |
| १२ | १५०/LP | दिप्ती राजेश मिरानी | बेलोंडेखार | ७/३ पै | ०-११-६५ | २८ | ९१ | १९० |
| १३ | ४६/DRN | सिमा रविंद्र डोंगरे | चाणजे | २४८/५ | ०-११-७० | २८ | ९० | १९० |
| १४ | १७१/NM | प्रकाश नथुराम देशमुख व इतर | गव्हाण<br>गव्हाण | ३६०/२/ई पै<br>३६०/२/ड/१ पै | ०ˉ०८ˉ५६<br>०-०४-२८ | २८ | ८४ | २१० |
| १५ | ०४/LP | सिध्दराम शामराव अरावली | बेलोंडेखार | ९१/१० | ०-१३-४० | २८ | ८३ | २२० |
| १६ | १४९/LP | भारती मनोहर कांबळे व इतर | बेलोंडेखार | ८८/३ | ०-१५-४० | २८ | ८२ | २३० |
| १७ | २०४/LP | भाऊसाहेब ना. पारधे | बेलोंडेखार | ७१/३ | ०-१५-४० | २८ | ८० | २५० |
| १८ | २७४/LP | राजेंद्र कुमार के बी एन व इतर | बेलोंडेखार | ७/६ पै | ०-१६-४० | २८ | ७९ | २६० |
| १९ | ३०६/LP | कैलास नामदेव पाटील | बेलोंडेखार | ४०/३ पै | ०-१६-३६ | २८ | ८१ | २६० |
| २० | ०८/LP | अक्षय श्रेणिकराज मुथा व इतर | बेलोंडेखार<br>बेलोंडेखार | ३५/५<br>४३/५ | ०-१३-४०<br>०-०४-३० | २८ | ६२ | २८० |
| २१ | ८८/NM | ताराचंद भोजराज वजरानी | वहाळ | ४२०/४ पै | ०-१८-० | २८ | ५९ | २९० |
| २२ | ११३/LP | उत्तम शंकर शेखर | बेलोंडेखार | ५१/५ | ०-१९-०० | २८ | ५८ | ३०० |
| २३ | २३१/LP | सुनिता अजय सिंह | बेलोंडेखार | ८३/१/उ | ०-१९-०० | २८ | ६३ | ३०० |
| २४ | १७४/LP | नमन प्रविण हेगडे व इतर | जांभूळपाडा | ३१/४ | ०-२०-०० | २८ | ५७ | ३२० |
| २५ | २८८/LP | भगवान नाथाजी बटुळे व इतर | चिरले | ४५/१ब पै | ०-२०-०० | २८ | ५६ | ३२० |
| २६ | २०३/NM | महादेव जोमा भगत व इतर | गव्हाण<br>गव्हाण | २५२/५<br>२२८/५ | ०-१३-००<br>०-०७-०० | २८ | ८७ | ३२० |
| २७ | ०९/LP | विनय नामदेव घरत | जासई<br>जासई | १७७/२<br>१७८/१ | ०-०६-००<br>०-१५-०० | २८ | ६४ | ३३० |
| २८ | ६५/LP | संजय रामचंद्र गावंडे व इतर | बेलोंडेखार | १०४/७ | ०-२२-५० | २८ | ६३ | ३६० |
| २९ | २४२/LP | वसंम व्ही. घुमरे व इतर | गावठाण | २६/७ब | ०-२३-०० | २८ | ६० | ३७० |
| ३० | २५६/LP | बिपीन त्रिलोकचंद कोठारी | गावठाण | २६/७ब | ०-२३-०० | २८ | ६५ | ४१० |
| ३१ | १७२/LP+३१५ /LP | अस्मिता किरण पाटील व इतर, अशोक सुदाम धोंडगे | बेलोंडेखार<br>बेलोंडेखार<br>जांभूळपाडा | ४५/७<br>६८/४<br>२१/२ पै | ०-०९-५०<br>०-१०-१०<br>०-१६-८० | २८ | ७० | ४२० |
| ३२ | १७९/LP | शैलेश बाबाराम सुर्वे | चिरले<br>चिरले<br>चिरले | ५५/२<br>५७/४<br>५७/५ | ०-१३-९०<br>०-११-६०<br>०-०१-०० | २८ | ६७ | ४२० |
| ३३ | २७१/LP | जयराम गोपाळ वनगा | जांभूळपाडा | १०/४ | ०-२७-९० | २८ | ६८ | ४४० |
| ३४ | ८३/NM | नृपाल जयंत पाटील | वहाळ | ४०५/१<br>४०५/६ | ०-०६-०<br>०-२३-० | २८ | ६९ | ४६० |
| ३५ | १९१/LP | सचिन भिमराव कोडग | चिरले<br>चिरले<br>चिरले | ३५/४<br>३६/३<br>६४/७ | ०-१९-२०<br>०-०८-१०<br>०-०३-०० | २८ | ६६ | ४८० |
| ३६ | १२९/NM | आरती गौरंग अग्रवाल व इतर | माणघर | २२/० | ०-३५-०० | २८ | ७८ | ५६० |
| ३७ | १७३/LP | सुदर्शन भिकाजी दातीर व इतर | चिरले | ५९/२अ | ०-३५-९० | २८ | ७४ | ५७० |
| ३८ | ०१/LP | सुधा विष्णुकुमार व्दिवेदी व इतर | बेलोंडेखार | २/२ | ०-३६-६० | २८ | ७६ | ५८० |
| ३९ | १३६/NM | दिलीप परशुराम देशमुख व इतर | गव्हाण | २६७/५ | ०-२५-०० | २८ | ७३ | ६१० |
| | | | गव्हाण | २६३/१ | ०-१३-७० | | | |
| ४० | ९८/DRN | पंकज किसनलाल सिंघवी | चाणजे | २७/०पै | ०-४०-०० | २८ | ७७ | ६३० |
| ४१ | १६०/NM | तुकाराम बाबुराम घारे | गव्हाण<br>गव्हाण | २७२/१<br>२७५/३ | ०-०७-३०<br>०-३४-३० | २८ | ७५ | ६६० |
| ४२ | २०३/LP+२१०/ LP+ २१६/LP | वैशाली सुधाकर पठारे | बेलोंडेखार<br>जांभूळपाडा<br>बेलोंडेखार | ३७/३पै<br>२५/५<br>४७/८ | ०-०९-००<br>०-१३-९०<br>०-२३-७० | २८ | ७२ | ७५० |
| ४३ | २२७/LP+२६ ७/LP | बिपिन तिलोकचंद कोठारी, कान्हा दुकल्या मढवी व इतर | बेलोंडेखार<br>बेलोंडेखार | ३७/५ पै<br>३७/५ पै | ०-२७-००<br>०-२१-१० | २८ | ७१ | ७७० |
| ४४ | २१९/LP | नानजी मुरजी दामा | जांभूळपाडा | ३०/४<br>३०/५<br>३०/८<br>३०/११ | ०-२६-३०<br>०-०८-८०<br>०-०३-५०<br>०-१३-९० | २८ | ११६ | ८३० |
| ४५ | ९०/DRN | विनायक भगवान पात्रुडकर व इतर | चाणजे | १८०/४<br>३२८/४ पैकी<br>३४५/२ पैकी<br>३४५/९ पैकी | ०-२०-३०<br>०-०८-४०<br>०-१५-९२<br>०-०८-६४ | २८ | ११८ | ८४० |
| ४६ | २३०/LP | दत्तात्रय ब. बांगर | बेलोंडेखार<br>बेलोंडेखार | ५९/९<br>५९/११ | ०-४३-००<br>०-१६-२० | २८ | ११९ | ८६० |
| ४७ | २०६/LP+२१५ /LP | विजय मेघजीभाई पटेल व इतर | बेलोंडेखार | ३१/३पै<br>९/३ | ०-३२-०<br>०-२२-१० | २८ | १२० | ८६० |
| ४८ | १२४/NM | निशा विजय बनसोडे व इतर | गव्हाण<br>गव्हाण<br>गव्हाण | ९७/८अ<br>९८/८/ब<br>२५५/११ | ०-२४-५<br>०-२०-७<br>०-१०-५ | २८ | १४ | ८८० |
| ४९ | १४९/NM | रमेश दत्तात्रेय धुमाळ | गव्हाण | २६५/१ | ०-५६-५० | २८ | ११५ | ८९० |
| ५० | ५६/DRN | गोपाळ उमाकांत शिंगाडे व इतर | चाणजे | १७०/४<br>१७०/५<br>१७०/६ | ०-१४-००<br>०-३०-७०<br>०-१३-०० | २९ | १३ | ९१० |
| ५१ | ९४/DRN+१९ ६/LP+२६२/L P | रामचंद्र शिवाजी माने व इतर, सोनाली धनराज शिंदे, निवृत्ती ज्ञानू जाधव | चाणजे<br>बेलोंडेखार<br>गावठाण | २९६/१ पै<br>१५/७पै<br>३९/४<br>३/६ | ०-१५-००<br>०-०२-००<br>०-०७-१०<br>०-३४-८० | २७ | १२ | ९४० |
| ५२ | १८२/LP+१८३ /LP | किशोर हसुराम मुंबईकर व दिलीप हसुराम मुंबईकर | बेलोंडेखार<br>बेलोंडेखार | ७०/५ पै<br>६९/१ब | ०-२७-८५<br>०-३७-०० | २७ | १३A | १०३० |
| ५३ | १६९/NM + १८३/NM | सुजित सुभाष थोरात व इतर | गव्हाण | ३०४/२१/अ<br>३०९/४ | ०-५४-०<br>०-१२-० | २७ | १३ | १०४० |
| ५४ | १५५/LP | रविंद्र पाटील व अविनाश पाटील | बेलोंडेखार<br>गावठाण | ३५/९<br>४०/६<br>४०/७<br>४२/१अ<br>२८/१अ | ०-१५-२०<br>०-०५-३०<br>०-०७-३०<br>०-२२-५०<br>०-१७-९९ | २९ | ४२ | १०९० |
| ५५ | १०३/LP+१११/ LP | हेतल मिलिंद रूपारेल | जासई | ४०/२<br>४०/४ पै | ०-२३-००<br>०-४९-३० | २९ | ३२ | ११५० |
| ५६ | २२०/LP+८७/ NM | शाम महादेव ठाकूर व इतर, काशिनाथ त्रिंबक भगत व इतर | बेलोंडेखार<br>गव्हाण | १४/४<br>२५६/५ अ | ०-४०-२०<br>०-३५-०० | २८ | १०८ | १२०० |
| ५७ | १६२/NM+२७ ७/LP | बळीराम उकर्डे | गव्हाण | ३१९/१०<br>३१७/२<br>३०१/३ | ०-१५-२०<br>०-११-६०<br>०-०९-४० | २९ | ३३ | १२१० |
| | | | <br>बेलोंडेखार<br>जांभूळपाडा | ३१२/२<br>५७/१ पै<br>१२/२ पै | ०-१०-४०<br>०-१०-९३<br>०-१८-०० | | | |
| ५८ | १८०/LP+१९०/ LP | अनंता अत्माराम म्हात्रे व इतर, धनंजय राम म्हात्रे | बेलोंडेखार | ४२/११<br>४१/११<br>५८/११<br>५०/६<br>६९/१ड | ०-२१-००<br>०-१०-६०<br>०-०२-८०<br>०-१३-९०<br>०-२८-४० | २८ | १८A | १२१० |
| ५९ | ८६/NM+१५७ /NM+१८६/L P | विजय मारुती गायकवाड व इतर, कमल रामचंद्र देशमुख व इतर, कमलाकर चंदुलाल घरत व इतर | करंजाडे<br>गव्हाण<br>चिरले | ७२/१ अ<br>२६८/१<br>६९<br>४४/४अ | ०-२२-८०<br>०-१७-२०<br>०-१२-९०<br>०-५२-२० | २८ | १८B | १२३० |
| ६० | १९८/LP | अपर्णा अरविंद भोईर | जांभूळपाडा | ४३/७ | ०-७९-१० | २९ | ३१ | १२५० |
| ६१ | १०७/NM | काना हरी ठाकुर | माणघर | १९/२ | ०-८०-० | २८ | १११ | १२६० |
| ६२ | २८६/LP+२७९ /LP+३०७/LP | वासुदेव बाबू नाईक व इतर | बेलोंडेखार<br>जांभूळपाडा | ३/१०<br>१५/३ पै<br>३२/१३ पै<br>३१/१५ | ०-२०-२०<br>०-१८-९०<br>०-२५-००<br>०-१५-८० | २८ | १०९ | १२७० |
| ६३ | २०/LP+५५/D RN+२०७/LP +२८१/LP+२८ ७/LP | अभिषेक राजमोहन गुप्ता व इतर | पोंडखार<br>रानवड<br>बेलोंडेखार | ३/३पै<br>१२२/१<br>१०/८<br>५०/७<br>९४/८ पै | ०-३०-५०<br>०-०७-६०<br>०-०९-६०<br>०-१८-००<br>०-१६-५० | २९ | ३० | १३१० |
| ६४ | १३८/LP+१८१/ LP+२३५/LP+ १७८/NM | दिपक सावजी पटेल, मुकेश सावजी पटेल, प्रविण करोत्रा व इतर | बेलोंडेखार<br>जासई | १३/५<br>५०/१० पै<br>४३/६ पै<br>८४/४ | ०-१५-४०<br>०-१६-००<br>०-१६-१२<br>०-३४-८६ | २८ | ११० | १३२० |
| ६५ | ६०/LP+१९९/ LP+२५६/LP+ ३०२/LP | बिपीन कोठारी, शहाजी शिवाजी चव्हाण व इतर | गावठाण<br>बेलोंडेखार | २६/१६<br>४२/१३<br>३५/२<br>९३/१ए<br>९४/१० | ०-०६-००<br>०-१२-१०<br>०-०१-८०<br>०-०७-१०<br>०-२१-०० | २९ | २९ | १४३० |

**(संजय शं. जाधव)**
**अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२४०/२०२५-२६

CIDCO
WE MAKE CITIES

| अनु. क्र. | संचिका क्र. | भूधाराकांचे नाव | गाव | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | क्षेत्र | सेक्टर | भूखंड क्र. | पात्रता (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बेलोंडेखार | ५८/९ पै | ०-०१-९० | | | |
| | | | | ४७/६ | ०-२०-०० | | | |
| | | | | ४२/६ | ०-०६-१० | | | |
| | | | | ४३/२ | ०-१६-७० | | | |
| ६६ | ९३/DRN+९५/DRN+९६/DRN+१८१/NM+२२५/LP+२४९/LP | रक्षा चित्ते, अमोल पिंपळे, शाम बावळे, ऊल्हास माजरेकर, रतन भगत, मारुती साळूंखे, ऋषिकेश केसरे | चाणजे | २९६/१ पै | ०-१५-१० | २८ | १८C | १४३० |
| | | | | ३३३/२ पैकी | ०-११-५० | | | |
| | | | | ३३३/२ पैकी | ०-२१-१० | | | |
| | | | गव्हाण | ३६०/२/ई पै | ०-२१-४४ | | | |
| | | | | ३६०/२/ड/१ पै | ०-१०-७२ | | | |
| | | | बेलोंडेखार | ८२/६ पै | ०-०६-०० | | | |
| | | | | ९१/३ | ०-०३-०० | | | |
| ६७ | १८७/NM | जयेश रजनिकांत मेहता व इतर | करंजाडे | ६६/१ | ०-३५-०० | २८ | ९५ | १५१० |
| | | | | ६६/२ | ०-६०-६० | | | |
| ६८ | १३९/NM | रामनाथ चंदर भगत व इतर | जासई | ८४/२ | ०-११-९० | २९ | ४३ | १५५० |
| | | | | ८४/३/अ | ०-०३-५० | | | |
| | | | | ८५/१ | ०-२७-६० | | | |
| | | | | ८९/५ | ०-३६-०० | | | |
| | | | | ९०/४ | ०-११-७० | | | |
| | | | | ९१/३ | ०-०७-३० | | | |
| ६९ | २९७/LP+१४७/NM | लालजी बेरा, लिना बखाई, किरण भट्ट व इतर | गावठाण | ३८/३/ब | ०-२८-८० | २८ | ९४ | १६०० |
| | | | जासई | ४६/४ | ०-२६-९० | | | |
| | | | | ५१/१ पै | ०-३२-०० | | | |
| | | | गव्हाण | ३१०/४ | ०-०१-३० | | | |
| | | | | २९४/७/९/११ब | ०-१३-१० | | | |
| ७० | ४३/DRN+७९/DRN | जनार्दन केकाणे, विलास कांगणे, श्रीकांत काकड, सिध्दार्थ साबळे, ओमकार शेळके व इतर | चाणजे | ३२४/९ | ०-२५-८ | २८ | ९३ | १६०० |
| | | | | ३६५/१ | ०-३३-६० | | | |
| | | | | ४३/१८ पै | ०-१९-० | | | |
| | | | | ३६६/४ पै | ०-१०-७० | | | |
| | | | | ३६८/१ पै | ०-११-७५ | | | |
| ७१ | २५२/LP+२५३/LP+२५४/LP+२५५/LP+३२५/LP | सुमित बकाळ, शरनबसप्पा अल्लोळी, विष्णू कुंजर, महादेव जाध, सरिता अनंत कळसकर व इतर | बेलोंडेखार | १५/४ | ०-३३-६० | २९ | ४४ | १६७० |
| | | | | ८४/८ | ०-२३-५० | | | |
| | | | | ९१/२ | ०-०८-४० | | | |
| | | | | ९५/१अ पै | ०-३२-४० | | | |
| | | | | १/९ पैकी | ०-०६-५५ | | | |
| | | | | ९७/१ए | ०-०१-०० | | | |
| ७२ | ११९/NM+१२२/NM+१३२/NM+१७५/NM+१७७/NM+२९१/LP | नितीन अबोटी, आमित मिश्रा, शंकर भगत, अजयकुमार सवई व प्रविण पांडूरंग कडू | गव्हाण | ३१३/३ | ०-१६-९० | २९ | ४१ | १७१० |
| | | | | ३१९/८ | ०-०७-६० | | | |
| | | | | ३११/५/ब | ०-१२-५० | | | |
| | | | | ३१३/८ | ०-१०-६० | | | |
| | | | जासई | ८६/२ब | ०-०६-८० | | | |
| | | | | ८७/४अ | ०-३०-६० | | | |
| | | | गव्हाण | ३११/८ | ०-०५-८० | | | |
| | | | | ३१२/१२ | ०-०५-३० | | | |
| | | | | २५५/३ | ०-०७-३० | | | |
| | | | बेलोंडेखार | ४६/३ | ०-०२-८० | | | |
| | | | | ४९/६ | ०-०१-०० | | | |
| ७३ | १८४/NM | अनंत वामन पाटील व इतर | जासई | ७९/१/अ/२ | ०-५८-५० | २९ | ४० | |
| | | | | ७९/१/अ/१ | ०-५०-६८ | | | १७२० |
| ७४ | २८२/LP+२८९/LP+३१४/LP | गोविंद गजोरा व दिपेश गजोरा | बेलोंडेखार | ४१/५ पै | ०-०६-१० | २८ | ४६ & ४७ | १८१० |
| | | | | २१/९ | ०-२३-४० | | | |
| | | | | ६६/३ पै | ०-८४-५४ | | | |
| ७५ | ८२/NM | अनिल घरत व इतर | वहाळ | ४०७/१ | ०-७६-० | २९ | ३९ | १८३० |
| | | | | ४०७/२ | ०-०९-० | | | |
| | | | | ४०७/३ | ०-०४-०५ | | | |
| | | | | ४०७/५ | ०-१२-५ | | | |
| | | | | ४०७/६ | ०-१४-० | | | |
| ७६ | २०९/LP | मिनल संजय तुर्डे व इतर | जांभूळपाडा | ४७/३ | ०-१९-७० | २८ | ११४ | १८४० |
| | | | | ४७/२ | ०-१५-४० | | | |
| | | | | ४६/५अ पै | ०-३७-५० | | | |
| | | | | ४६/५ब पै | ०-४४-५० | | | |
| ७७ | १७७/LP | निर्मला चांगु पाटील व इतर | बेलोंडेखार | १/४ | ०-९३-२० | २९ | ३८ | २१३० |
| | | | | २१/७ | ०-४२-०० | | | |
| ७८ | ३८/DRN+१४६/LP+१९२/LP+१९४/LP+२१७/LP+२१८/LP | अरविंद पटेल (वाविया), कृष्णा वाविया व इतर | चाणजे | १७०/२ | ०-२६-९० | २८ | ८६ | २३४० |
| | | | | १७१/१ | ०-०६-३० | | | |
| | | | बेलोंडेखार | ३/९ पै | ०-१६-०० | | | |
| | | | | ६८/११ | ०-१३-४० | | | |
| | | | | ५१/४ | ०-०१-५० | | | |
| | | | | ५६/९ | ०-०८-२० | | | |
| | | | जांभूळपाडा | ८/२ब पै | ०-१०-०० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५०/२ | ०-०५-६० | | | |
| | | | | ५६/६ पै | ०-०९-२५ | | | |
| | | | | ९६/१अ | ०-४०-०० | | | |
| ७९ | ६८/DRN+७८/DRN+१३१/NM+१९२/NM+२४७/LP+२६८/LP | विजय कदम | चाणजे | ३१ पै | ०-२४-९० | २८ | १०३ | २५४० |
| | | | | ३९/४ | ०-२२-० | | | |
| | | | | ३२६/२ब पै | ०-१६-८० | | | |
| | | | गव्हाण | ३६०/१/क | ०-१४-०० | | | |
| | | | | २६३/४ | ०-०३-८० | | | |
| | | | | २६३/२ | ०-१०-४० | | | |
| | | | | ४२/७ | ०-०७-६० | | | |
| | | | बेलोंडेखार | ४५/८ | ०-१८-५० | | | |
| | | | | ५६/१० | ०-०८-८० | | | |
| | | | गावठाण | ३४/९ | ०-११-५० | | | |
| | | | जांभूळपाडा | ४३/९ पै | ०-२०-०० | | | |
| ८० | २८५/LP+११५/DRN | नेविल मानेकजी | बेलोंडेखार | ५/६ | ०-१२-६० | २८ | १०२ | २६२० |
| | | | चाणजे | ३४३/१ब | ०-२४-५० | | | |
| | | | | २१४/४ | ०-१९-०० | | | |
| | | | | २७८/७ | ०-०५-०० | | | |
| | | | | २७३/१ पै | ०-२५-५० | | | |
| | | | | २७३/७ पै | ०-०३-०० | | | |
| | | | | १५९/४ | ०-१४-५० | | | |
| | | | | ३३५/४ | ०-१३-१० | | | |
| | | | | ३५५ | ०-४८-६० | | | |
| ८१ | ४२/DRN | भैरूलाल नंदलाल जैन व इतर | चाणजे | ३६९/२ | ०-५८-७ | २८ | ८५ | २७६० |
| | | | | ३६९/१/अ/१ पै | ०-३२-० | | | |
| | | | | ३४४/१ | ०-८४-६० | | | |
| ८२ | ११८/DRN+११९/DRN+२००/NM+३२२/LP | लौकीक राणे, अरबाज खान, गुरमित धोडी, महेश पाटील, पंकज शिंदे, मोहम्मद शेख,ललित कुंभार व संजय जैन | चाणजे | ३१ पै | ०-१५-०० | २८ | १०१ | २८७० |
| | | | | २४३/६ | ०-३३-० | | | |
| | | | | २४३/५ | ०-०२-० | | | |
| | | | जासई | ७९/५ | ०-३१-१० | | | |
| | | | चिरले | ६१/१/अ पै | ०-२०-८५ | | | |
| | | | | ६१/१/क | ०-२९-९० | | | |
| | | | | ६३/३/ब | ०-४९-२० | | | |
| ८३ | १२०/NM | हिम्मत गणेशलाल कच्छारा व इतर | गव्हाण | ९६/४ पै | १-८५-५० | २८ | १८ | २९३० |
| ८४ | २०९/NM | चंद्रभागा आनंत ठाकूर व इतर | गव्हाण | २५५/१ | ०-६७-२० | २९ | १८ | २९३० |
| | | | | २५०/१० | ०-११-६० | | | |
| | | | | २५७/२अ | ०-८१-०० | | | |
| | | | | २५६/४ | ०-०५-३० | | | |
| | | | | २५५/१० | ०-०२-०० | | | |
| | | | | २५०/१२ | ०-०७-६० | | | |
| | | | | २५६/३ | ०-१०-७० | | | |
| | | | | २५५/९ | ०-००-२० | | | |
| ८५ | १६५/NM | पंढरीनाथ कमळया उर्फ कमल म्हात्रे | गव्हाण | २५५/९ | ०-१३-२० | २९ | १७ | २९३० |
| | | | | २५०/१ | ०-१७-५० | | | |
| | | | | २५०/११ | ०-०९-६० | | | |
| | | | | २५०/३/क | ०-६६-९० | | | |
| | | | | २५०/४ | ०-११-०० | | | |
| | | | | ९६/४ पै | ०-६७-५० | | | |
| ८६ | ११०/DRN+१९३/NM+१९४/NM | मांगीलाल जैन, मयुरेश चौधरी, शुभांगी घरत व इतर | चाणजे | ३२ पै | ०-४०-०० | २९ | १९ | २९५० |
| | | | गव्हाण | ३०४/२२ | ०-१९-०० | | | |
| | | | जासई | ८१/३ | १-१२-०० | | | |
| | | | | ८१/५ | ०-१६-०० | | | |
| ८७ | १२७/NM+२५०/LP | कमल रामचंद्र देशमुख व इतर | गव्हाण | ३५६/१ | ०-२४-०० | २८ | १०७ | २९९० |
| | | | | ३५६/८ | ०-४७-० | | | |
| | | | | ३५६/११ | ०-५०-०० | | | |
| | | | | २७५/४पै | ०-१४-१० | | | |
| | | | | २७५/१ | ०-३०-२० | | | |
| | | | | २७५/२/पै | ०-१८-१० | | | |
| | | | जांभूळपाडा | ११/८ | ०-०६-०० | | | |
| ८८ | १४६/NM | रूस्तम गोदरेज जोशी | गव्हाण | ३०९/३ ब | ०-४३-३ | २९ | २० | ३१०० |
| | | | | ३१०/७ | ०-२२-३० | | | |
| | | | | ३२०/१/अ | ०-०१-५० | | | |
| | | | | ३२०/५ | ०-०१-०० | | | |
| | | | | ३१०/५ | ०-१७-७० | | | |
| | | | | ३१०/८ | ०-०८-१० | | | |
| | | | | ३०८/१अ | ०-४७-१० | | | |
| | | | | ३०९/२ | ०-१३-१ | | | |
| | | | | ३०९/३अ | ०-३०-४ | | | |
| | | | | ३२१/८ | ०-१२-१ | | | |
| ८९ | ६२/DRN+१६२/LP+२११/LP | सागर पटेल, भरत टकले, सुरेश केणी, | चाणजे | २६९/४ | ०-१४-९० | २८ | १०५ | ३२०० |
| | +२२८/LP+२३८/LP | ललित कुंभार व इतर | बेलोंडेखार | ४५/५ | ०-४३-९० | | | |
| | | | | ६८/१२ | ०-१०-१० | | | |
| | | | | ६८/१० | ०-१३-०० | | | |
| | | | | १८/९ | ०-७३-१० | | | |
| | | | | ३२/१ | ०-१०-४० | | | |
| | | | जासई | १६४/५ पै | ०-१०-०० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५२/८ पै | ०-०९-३० | | | |
| | | | | ७९/८ | ०-३६-४० | | | |
| ९० | २४८/LP+२५८/LP+२५९/LP+२६०/LP | अनुराग नाईक, सुचित्रा काळे, सुरेखा ढोले, अक्षय बागल | बेलोंडेखार | १०३/४पै | ०-२०-३० | २८ | ४५ | ३२२० |
| | | | | ८२/४ | ०-२४-३० | | | |
| | | | | ८२/२अ | ०-१४-०० | | | |
| | | | | ८२/२ब | ०-१४-०० | | | |
| | | | | ९४/१ | ०-११-९० | | | |
| | | | | ८१/६ | ०-२६-८० | | | |
| | | | | ८१/११ | ०-१०-६० | | | |
| | | | | ८२/३/अ | ०-३९-४० | | | |
| | | | | ८३/११ | ०-०४-६० | | | |
| | | | | ८३/३ | ०-१३-९० | | | |
| | | | गावठाण | २५/१ पै | ०-२७-०० | | | |

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**(संजय शं. जाधव)**
**अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
सिडको/जनसंपर्क/२४०/२०२५-२६

CIDCO
WE MAKE CITIES

| अनु. क्र. | संचिका क्र. | भूधाराकांचे नाव | गाव | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | क्षेत्र | सेक्टर | भूखंड क्र. | पात्रता (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९१ | २२९/LP+२७५/LP+२७६/LP+३१९/LP | दिव्येश नाकराणी, राजू पाटील, जयवंत पाटील व इतर | बेलोंडेखार | ७९/४ | ०-४१-६० | २८ | १०६ | ३३४० |
| | | | | ७७/२ | ०-२७-३० | | | |
| | | | | ७७/९ | ०-४६-७० | | | |
| | | | | ५६/५ | ०-३०-४० | | | |
| | | | | ५०/१० पै | ०-२२-०० | | | |
| | | | | ६०/१० | ०-०१-०० | | | |
| | | | जांभूळपाडा | १०/१ | ०-०५-०० | | | |
| | | | | ११/९ | ०-३७-४० | | | |
| ९२ | ४७/DRN+४८/DRN+१०४/NM | दर्शन प्रेमचंद सिंग, संदीप शिवाजी ढेंबरे, महेश रामदास गुप्ता,पूजा आनंद जौहरी, केतकी मुकेश शर्मा, दिपकराज पांडुरंग पवार,द्रगपाल रामनारायण सचान व अशोक काशिनाथ पाटील | चाणजे | २५७/४ पै | ०-०३-४४ | २९ | २२ | ३४९० |
| | | | | ३४१/१ पै | ०-५४-८४ | | | |
| | | | | ३५४/२/अ/पै | ०-२६-८० | | | |
| | | | | ३५४/२/क/पै | ०-०५-०४ | | | |
| | | | | २५७/४ पै | ०-०१-७२ | | | |
| | | | | ३४१/१ पै | ०-२७-४२ | | | |
| | | | | ३५४/२/अ/पै | ०-१३-४ | | | |
| | | | | ३५४/२/क/पै | ०-०२-५२ | | | |
| | | | करंजाडे | ७०/२ | ०-८५-८० | | | |
| ९३ | २१/DRN+४५/DRN+६१/DRN+८४/DRN | निरंजन संभाजी झेंडे व इतर | चाणजे | ४३/१२ | ०-५१-० | २९ | २३ | ३५२० |
| | | | | ३६०/८ | ०-२०-६ | | | |
| | | | | ३५४/२ब | ०-१६-५ | | | |
| | | | | २७८/६ | ०-०५-०० | | | |
| | | | | २८८/१ | ०-१६-२० | | | |
| | | | | २६४/२ब | ०-५०-६० | | | |
| | | | | ३६८/२ | ०-३०-६० | | | |
| | | | रानवड | ११९/६ | ०-०३-० | | | |
| | | | | १३२/३ | ०-२३-६० | | | |
| | | | | १३३/४ | ०-०४-५ | | | |
| ९४ | १०९/DRN+११७/DRN+१३३/NM+१७०/NM+२७८/LP+२८३/LP+२९०/LP+२९२/LP+२९३/LP+२९५/LP+२९८/LP+३१३/LP | गोविंद गजोरा व पार्थ गजोरा | चाणजे | १५०/३ | ०-२८-६० | २८ | ५२ | ३६२० |
| | | | | १५०/१ | ०-१५-९० | | | |
| | | | | २७४/१ब पैकी | ०-२१-५० | | | |
| | | | जासई | ३१०/३ | ०-०८-१० | | | |
| | | | | ३२१/५ | ०-०६-८० | | | |
| | | | | १२३/१/अ | ०-०८-९० | | | |
| | | | जांभूळपाडा | ११/४/अ | ०-२८-०० | | | |
| | | | | १३/५ | ०-०६-३० | | | |
| | | | बेलोंडेखार | ६०/८ पै | ०-१७-५० | | | |
| | | | | ५९/७ | ०-१६-१० | | | |
| | | | जासई | १७७/५ | ०-०९-४० | | | |
| | | | | २०५/२ | ०-११-४० | | | |
| | | | जांभूळपाडा | ३१/१४ पै | ०-१९-३० | | | |
| | | | गावठाण | ३५/३ | ०-१७-४० | | | |
| | | | | ३८/७ | ०-०३-५० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५६/११ | ०-०८-६० | | | |
| ९५ | २९/DRN+३१/DRN+६३/DRN+६९/DRN+८७/DRN+८९/DRN+२३७/LP+२७३/LP+२८४/LP+३००/LP+३०५/LP | आदित्य जाधव, आर्यमान जाधव, निनाथ शिंगाडे व इतर | चाणजे | २५८/२ पै | ०-२०-० | २९ | २४ | ३६९० |
| | | | | २५८/२ पै | ०-४५-० | | | |
| | | | | ३३७/२ | ०-२७-४० | | | |
| | | | | ३४२/७ | ०-१२-४० | | | |
| | | | | ३६०/१ | ०-०७-६० | | | |
| | | | | ३२६/२/ब | ०-१६-८० | | | |
| | | | | १६९/३ | ०-१५-७० | | | |
| | | | | १७५/२ | ०-०४-५० | | | |
| | | | बेलोंडेखार | ४५/२ | ०-०९-१० | | | |
| | | | | ८१/२ पै | ०-१५-१० | | | |
| | | | | ८१/८ | ०-१२-९० | | | |
| | | | | १८/१० पै | ०-०४-०० | | | |
| | | | | ८१/१० | ०-०७-१० | | | |
| | | | गावठाण | ३५/५ पै | ०-२०-३० | | | |
| | | | बेलोंडेखार | ४४/४ | ०-०४-०० | | | |
| | | | | ५७/२ | ०-०२-५० | | | |
| | | | | ६१/४ | ०-०७-१० | | | |
| ९६ | १७९/NM+१८०/NM | प्रविणकुमार दुबारीया, विलास देशमुख व इतर | गव्हाण | ३६०/२/ड/२ पै | १-१९-१५ | २८ | १०४ | ३७६० |
| | | | | ३६०/२/ड/२ पै | १-१९-१५ | | | |
| ९७ | ११३/DRN+२६३/LP+२८०/LP | संकेत शाह, अमृत शांखला व इतर | चाणजे | ३५७ पै | ०-७५-०० | २८ | ९८ | ३९३० |
| | | | बेलोंडेखार | ७/२ | ०-४९-१० | | | |
| | | | | ८/८ | ०-४७-५० | | | |
| | | | | ११/६ | ०-४७-८० | | | |
| | | | जांभूळपाडा | १२/७ | ०-११-४० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५/३ | ०-१७-८० | | | |
| ९८ | १०८/DRN+१२५/NM+१८५/NM+१८६/NM+१७०/LP | मोहनिश छाजेर | चाणजे | २८६/७ पै | ०-१६-५० | २९ | ४५ | ४३९० |
| | | | गव्हाण | २०५/१अ/१ | ०-४४-४० | | | |
| | | | | ३०४/१७ | ०-५०-०० | | | |
| | | | | ३१३/९ | ०-२८-६० | | | |
| | | | | ३१८/१ | ०-०७-८० | | | |
| | | | | २८५/२अ | ०-११-६० | | | |
| | | | | २८५/२ब | ०-१४-०० | | | |
| | | | | २९५/१ | ०-४१-६० | | | |
| | | | | ३२९/२ब | ०-१६-८० | | | |
| | | | जांभूळपाडा | ३१/१पै | ०-२५-३३ | | | |
| | | | | ८/५पै | ०-२१-६६ | | | |
| ९९ | ८२/DRN+८८/DRN+९२/DRN | शुभांगी घरत,ब्रिजेश सिंह, गणपत गुप्ता व इतर | चाणजे | ४३/१४ पै | ०-८८-० | २८ | १० | ४४४० |
| | | | | २७ पै | ०-३०-४३ | | | |
| | | | | ४३/१५ | १-६३-०० | | | |
| १०० | ११६/DRN+३१८/LP | दिपेश गजोरा व पंढरीनाथ भोईर, प्रकाश हिराजी तांडेल, रमेश हिराजी तांडेल, गणुबाई रामचंद्र ठाकूर, आशा प्रकाश घरत, | चाणजे | २८० पै | ०-७८-९० | २८ | ५१ | ५००० |
| | | | | २७९/१ पै | ०-५३-१५ | | | |
| | | | | २८० पै | ०-७८-९० | | | |
| | | | | २७९/१ पै | ०-५३-१५ | | | |
| | | | पौंडखार | २/३ | ०-३६-०० | | | |
| | | | | ५/५ | ०-१६-८० | | | |
| १०१ | १०८/NM+११०/NM+१११/NM+११२/NM | अरुणा पाटील,स्मितेश सुराणा, संजीव अग्रवाल व इतर | माणघर | २०/० | ०-४१-० | २८ | ५३ | ५०९० |
| | | | | १९/१ | १-४२-३० | | | |
| | | | | ३०/२ | ०-४५-० | | | |
| | | | | ३५/० | ०-१२-६० | | | |
| | | | | ३८/० | ०-२९-६० | | | |
| | | | | ५४/० | ०-२९-३० | | | |
| | | | | ५६/० | ०-२१-७० | | | |
| १०२ | १०/DRN+११/DRN+१६/DRN | विनोद सिंघानिया, रवी गोयंका, निहारीका गोयंका | चाणजे | २७ पै | १-७०-७७ | २९ | ८ | ५२७० |
| | | | | २७ पै | १-१३-७६ | | | |
| | | | | ४३/१८ पै | ०-२५-५ | | | |
| | | | | ४३/१९ पै | ०-२३-५ | | | |
| १०३ | ४४/DRN+५८/DRN+१०४/DRN+१९७/LP+२०१/LP+२०५/LP+२१४/LP+२३२/LP+२६४/LP | श्रीनाथ शुक्ला व जेनिश शांखला | रानवड | ११/१ | ०-१३-७० | २९ | २७ | ६२१० |
| | | | चाणजे | ३४५/१३ पै | ०-०६-४० | | | |
| | | | चाणजे | २७१/४ | ०-१०-६० | | | |
| | | | कौळीबंधनखार | १/१/अ/३ | ०-४८-६० | | | |
| | | | बेलोंडेखार | ९/७ | ०-१७-४० | | | |
| | | | बेलोंडेखार | २३/२ | ०-५४-३० | | | |
| | | | जांभूळपाडा | १२/४ | ०-११-४० | | | |
| | | | बेलोंडेखार | ११/२ | ०-५४-९० | | | |
| | | | जांभूळपाडा | ९/४अ पै | ०-३९-३० | | | |
| | | | बेलोंडेखार | ८४/३ पै | ०-२४-७० | | | |
| | | | बेलोंडेखार | ८३/१ | ०-०५-६० | | | |
| | | | बेलोंडेखार | १०/६ | ०-३८-७० | | | |
| | | | जांभूळपाडा | ९/६ | ०-२७-३० | | | |
| | | | बेलोंडेखार | ४१/१४ | ०-२०-०० | | | |
| | | | जांभूळपाडा | ४३/१२ | ०-१९-६० | | | |
| १०४ | ११६/NM+१६६/NM+१६८/NM | सतीश रामचंद्र घरत | जासई | ९५/४ | ३-८७-५० | २८ | ५ | ६८४० |
| | | | | ९५/७ | | | | |
| | | | | ९६/१ | | | | |
| | | | | ९६/३ | | | | |
| | | | | ९६/५ | | | | |
| | | | | ९७/३ | | | | |
| | | | | ९५/६ | | | | |
| | | | | ९६/२ | | | | |
| | | | | ९५/४ | | | | |
| | | | | ९४/१ | ०-१३-४० | | | |
| | | | | ९४/२ | ०-११-१० | | | |
| | | | | ८१/२/अ | ०-४३-०० | | | |
| | | | | ८१/२/ब | ०-२३-०० | | | |
| १०५ | ५२/DRN+५३/DRN+५४/DRN+६६/DRN+७१/DRN+७३/DRN+८०/DRN+८६/DRN+९१/DRN+१००/DRN+१११/DRN+६३/NM+१२८/NM+१३४/LP+१८८/LP+२२८/LP+२५०/LP | सागर पटेल, अभिजीत पाटील, सुरेखा कारले, ललित कुभांर, राम म्हात्रे, ऊर्वशी सिंघवी, बिना जैन, सिमा देसाई व इतर | चाणजे | ३६५/१ पै | ०-४०-०० | २८ | १०० | ७९१० |
| | | | | २६१/४/ब | ०-०६-६० | | | |
| | | | | ३३५/२ | ०-१०-१० | | | |
| | | | | ३४५/३ | ०-१३-७० | | | |
| | | | | ३४५/१० | ०-०४-०० | | | |
| | | | | ३६६/१ | ०-३४-७० | | | |
| | | | | ३४३/१अ | ०-२७-३० | | | |
| | | | | ३४४/३ | ०-१२-९० | | | |
| | | | | ३६९/१/अ/१ पै. | ०-०७-०० | | | |
| | | | | ३६२/१/२ | ०-५५-७० | | | |
| | | | | ३२९/३ पै | ०-०८-०० | | | |
| | | | | ३४५/५ | ०-०२-८० | | | |
| | | | | ३३४/१ | ०-२१-५० | | | |
| | | | | ४३/१६ | ०-१०-०० | | | |
| | | | | २४३/३ | ०-०४-८० | | | |
| | | | | २४३/४ | ०-१३-८० | | | |
| | | | | २५०/२ | ०-२९-६० | | | |
| | | | | ३२०/११ | ०-०८-०० | | | |
| | | | गव्हाण | २६४/१ | ०-२७-३० | | | |
| | | | | ३१२/९/१० | ०-०२-५० | | | |
| | | | | ३१२/११ | ०-०२-५० | | | |
| | | | | ३१९/९ | ०-०५-०० | | | |
| | | | बेलोंडेखार | ३९/९ | ०-०६-३० | | | |
| | | | | ८२/६पै | ०-०५-९५ | | | |
| | | | जांभूळपाडा | १५/५ | ०-२४-९० | | | |
| | | | जांभूळपाडा | ९/४अ पै | ०-१६-८० | | | |

**(संजय शं. जाधव)**
**अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२४०/२०२५-२६

CIDCO
WE MAKE CITIES

| अनु. क्र. | संचिका क्र. | भूधारकांचे नाव | गाव | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | क्षेत्र | सेक्टर | भूखंड क्र. | पात्रता (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बेलोंडेखार | ३२/१ | ०-१०-४० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५२/८ पै | ०-०९-३० | | | |
| | | | | २१/५ पै | ०-४०-६० | | | |
| | | | | ७९/७ | ०-३७-२० | | | |
| १०६ | १४३/LP | रुची कपील अग्रवाल व इतर | गावठाण | २१/१ | ०-०९-६० | २९ | ३४ | ८४१० |
| | | | | २१/२ | ०-१३-४० | | | |
| | | | | २१/३ | ०-२०-२० | | | |
| | | | | २१/४ | ०-२०-२० | | | |
| | | | | २१/५ | ०-३१-६० | | | |
| | | | | २२/३ | ०-६५-६० | | | |
| | | | | २२/४ | ०-३४-१० | | | |
| | | | | २२/५ | ०-०६-३० | | | |
| | | | | २३/१ | ०-३३-४० | | | |
| | | | | २३/३ | ०-१०-९० | | | |
| | | | | २३/४ | ०-०१-५० | | | |
| | | | | २४/४अ | ०-२७-९० | | | |
| | | | | २४/४ब | ०-०८-०० | | | |
| | | | | २४/६ | ०-०६-८० | | | |
| | | | | २४/७ | ०-०८-१० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५३/१ | ०-१२-४० | | | |
| | | | | ५३/२ | ०-३६-७० | | | |
| | | | | ५३/३ | ०-२८-८० | | | |
| | | | | ५३/४ | ०-२०-०० | | | |
| | | | | ५३/५ | ०-३०-९० | | | |
| | | | | ५३/७ | ०-४४-४० | | | |
| | | | | ५५/१ | ०-४२-०० | | | |
| | | | | ५३/६ | ०-२०-५० | | | |
| १०७ | २६/DRN+४० /DRN+५०/D RN+५१/DRN +६५/DRN+७ ७/DRN+८१/ DRN+१०१/D RN+१०२/DR N+१०३/DRN +१०५/DRN+ १०६/DRN+२ ३६/LP | महानंदा गलधर,गोरख लंके, सुनिता कुलट व इतर, बाबासाहेब कुलट व इतर | चाणजे | २७ पै | १-००-०० | ३० | १ | १००६० |
| | | | | ३१ पै | ०-४०-० | | | |
| | | | | ३५/२ | ०-७९-२ | | | |
| | | | | ४० पै | ०-२०-३० | | | |
| | | | | ४० पै | ०-२०-०० | | | |
| | | | | २७ पै | १-६०-०० | | | |
| | | | | ३४ पै | ०-१७-७० | | | |
| | | | | ४३/१४ पै | ०-४०-० | | | |
| | | | | २७ पै | ०-२०-०० | | | |
| | | | | २७ पै | ०-२०-०० | | | |
| | | | | २७ पै | ०-४५-१० | | | |
| | | | | २७ पै | ०-२०-०० | | | |
| | | | | २७ पै | ०-२०-०० | | | |
| | | | बेलोंडेखार | ९६/१ड | ०-२२-०० | | | |
| | | | जांभूळपाडा | ९/१ | ०-११-६० | | | |
| १०८ | ३७/DRN+५९ /DRN+६४/D RN+२२२/LP | मधु जैन, करण घरत, साहीद अहमद झाकीर हुसैन मलिक | चाणजे | २७ पै | ४-८०-८ | २९ | २१ | १०२९० |
| | | | | ४० पै | ०-३४-६० | | | |
| | | | | २७ पै | १-१७-०६ | | | |
| | | | चिरले | ६३/२अ पै | ०-१९-२० | | | |
| १०९ | १५/LP+१०७A /LP+२४६/LP +२६९/LP+२७ २/LP+ ४१/DRN+४९ /DRN+५७/D RN+७०/DR N+८३/DRN+ ९७/DRN+१८ २/NM+१८८/ NM | नितीन गाजीपारा व प्रशांत गाजीपारा | गावठाण | ३८/८ | ०-०२-०० | २८ | ९९ | १३९०० |
| | | | बेलोंडेखार | ७/३ पै | ०-११-६५ | | | |
| | | | बेलोंडेखार | १२/८ | ०-०६-१० | | | |
| | | | बेलोंडेखार | ५७/६ | ०-०४-३० | | | |
| | | | जांभूळपाडा | ३२/१२ पै | ०-१८-०० | | | |
| | | | चाणजे | ३४३/२ | ०-२७-६० | | | |
| | | | चाणजे | ३३७/५ | ०-१३-० | | | |
| | | | चाणजे | १६५/२ | ०-०६-८ | | | |
| | | | चाणजे | ३२७/४ | ०-२६-० | | | |
| | | | चाणजे | ३४५/११ | ०-०६-१ | | | |
| | | | चाणजे | ३३७/६ | ०-१९-० | | | |

| अनु. क्र. | संचिका क्र. | भूधारकांचे नाव | गाव | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | क्षेत्र | सेक्टर | भूखंड क्र. | पात्रता (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | चाणजे | २७७/१क | ०-३०-० | | | |
| | | | चाणजे | २६२/१ब | ०-०७-६० | | | |
| | | | चाणजे | ३४२/१ | ०-३६-३० | | | |
| | | | चाणजे | २६१/२ | ०-४४-७० | | | |
| | | | चाणजे | ३५१/२ | ०-११-५० | | | |
| | | | चाणजे | ३२०/४ | ०-१०-५० | | | |
| | | | चाणजे | २६७ | ०-६७-२० | | | |
| | | | चाणजे | २६०/२ | ०-११-९० | | | |
| | | | चाणजे | २६२/२ब | ०-४-५० | | | |
| | | | चाणजे | ३५/१ पै | ०-६६-१९ | | | |
| | | | चाणजे | २७५/२ क | ०-१४-९० | | | |
| | | | चाणजे | ३६७/१२ | ०-०६-६० | | | |
| | | | रानवड | १२६/४ | ०-२०-० | | | |
| | | | चाणजे | २७३/५ | ०-१०-०० | | | |
| | | | चाणजे | २६९/१ | ०-४४-८० | | | |
| | | | चाणजे | २६८/३ | ०-१९-५० | | | |
| | | | चाणजे | २७१/७ | ०-१६-१० | | | |
| | | | चाणजे | २५२/५ | ०-५२-७० | | | |
| | | | चाणजे | १७१/१० | ०-०६-३० | | | |
| | | | चाणजे | १७१/२ | ०-१९-६० | | | |
| | | | चाणजे | १७१/४ | ०-०३-० | | | |
| | | | चाणजे | १७१/८ | ०-१६-० | | | |
| | | | चाणजे | २६९/३ | ०-०७-०० | | | |
| | | | चाणजे | ३६७/८ | ०-१२-६० | | | |
| | | | जासई | ६३ | ०-११-१० | | | |
| | | | जासई | ६४/१ | ०-६८-०० | | | |
| | | | जासई | ६४/७ | ०-०७-०० | | | |
| | | | जासई | ६२/१ | ०-२७-८० | | | |
| | | | गव्हाण | २९९/० | ०-०३-५० | | | |
| | | | गव्हाण | ३००/३/अ | ०-१२-४० | | | |
| | | | गव्हाण | ३००/४ | ०-१०-०० | | | |
| | | | गव्हाण | ३००/५ | ०-६०-६० | | | |

३. भूखंडाचे वाटप व भाडेपट्टा करारनामा निष्पादित करणेकामी खालील नमुद कागदपत्रे या कार्यालयात सादर करावयाचे आहेत :-

अ) २२.५% योजनेअंतर्गत भूखंड वाटपासाठी संबंधित भूधारकांच्या स्वाक्षरीचे अर्ज
ब) हमीपत्र, बंधपत्र, प्रतिज्ञापत्र (रु. ५००/- च्या स्टँम्प पेपरवर नोटराईज)
क) भूधारक मयत असल्यास न्यायालयाने प्रमाणित केलेला वारस दाखला, वारसांचे प्रतिज्ञापत्र (नोटराईज)
ड) ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड)

४. इरादित भूखंडाचे वाटप व भाडेपट्टा करारनामा निष्पादनासाठी या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की:-
परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या इरादित भूखंडाचे वाटप व भाडेपट्टा करारनामा निष्पादित करण्यासाठी पात्रताधारक/हितसंबंधित व्यक्ती यांनी संपादित जमीन/इरादित भूखंडाबाबत सक्षम न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/ कायदेशीर वारसाचा दावा/ हरकती प्रलंबित असल्यास, त्याबाबत सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या दस्ताऐवजासह अर्ज **अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन) भूमि संपादन विभाग, पहिला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४** येथे दाखल करावीत. तसेच वर नमुद प्रकरणांमध्ये निवाडा, सिडकोच्या नावे अद्ययावत गाव नमुना नं. ७/१२ व तदअनुषांगिक दस्ताऐवजांची तपासणी करुन इरादित भूखंडाचे वाटप व भाडेपट्टा करारनामा निष्पादित करण्याबाबत प्रकरण परत्वे गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल.

**(संजय शं. जाधव)**
**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२४०/२०२५-२६

# सकल मराठा समाजाकडून विजयी जल्लोष

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून उपोषण सुरू केल्यानंतर कर्जत तालुक्यातून आंदोलक यांच्यासाठी मदतीचा ओघ सुरू होता. मराठा समाजाच्या आठ पैकी सहा मागण्या मान्य झाल्या असून त्याबद्दल कर्जत येथे विजयी जल्लोष करण्यात आला.

कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विजयी रॅली सुरू झाली. कारमधून कार्यकर्ते बाजारपेठमधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे पोहचले आणि यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला.

त्यानंतर ही कार रॅली यांनी धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सांगता केली.

त्या ठिकाणी बोलताना मराठा समन्वयक उदय पाटील योंनी या लढ्याला समाजातील बांधवानी मदत केली. मुस्लिम बांधवानी आंदोलकांना राहण्यासाठी मशिदी खुल्या केल्या, बौद्ध बांधवानी प्रत्येक मोर्चात पाणी अन्न वाटप केले, जैन बांधवानी लागेल ती मदत करण्याचे जाहीर केले. आगरी समाजातील अनेकांनी पाठिंबा दिला परंतु प्रखर हिंदू संघटनानी काहीही मदत न केल्याची खंत बोलून दाखवली. या प्रसंगी राजेश लाड, शंकर थोरवे, कैलास म्हामले, अनील भोसले, प्रमिला बोराडे, राहुल डाळींबकर, अनिस मन्यार, मधुकर घारे, उमेश गायकवाड, उमेश म्हसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## आँचल दलाल यांनी केले प्रोत्साहित | पोलिसाच्या नावाने आवारात वृक्षारोपण

# पोलादपूर पोलीस ठाण्याला 'सरप्राईज व्हिजिट'

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

पोलादपूर पोलीस ठाण्याला रायगड पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी सरप्राईज व्हिजिट दिली. पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये प्रत्येक पोलिसाच्या नावाने वृक्षारोपण करण्याच्या सूचनेमुळे पोलादपूर पोलिसांचे मनोधैर्य उंचावले आहे.

पोलादपूर पोलीस ठाण्याला आयपीएस अधिकारी तत्कालीन रायगड पोलीस अधिक्षक सुवेझ हक यांनी नवीन इमारतीमध्ये स्थलांतरणासंदर्भात दिलेल्या व्हिजीटनंतर यंदा प्रथमच आयपीएस अधिकारी रायगड पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी सरप्राईज व्हिजिट दिली. यावेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी पोलीस कर्मचारीवृंदासह रायगड पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांना मानवंदना दिली.






यानंतर पोलीस ठाण्यातील श्रीगणेशाचे भक्तीभावाने दर्शन घेऊन आयपीएस अधिकारी रायगड पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी पोलादपूर पोलिसांसोबत थेट संवाद साधला. याप्रसंगी महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे हेदेखील उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी शाळकरी विद्यार्थी व विद्यार्थिंनीसमवेत अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने खासगी व सरकारी शाळांच्या संपर्कात राहून सतर्कतेने गुन्ह्यांचे प्रमाण टाळण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करून विविध प्रकारच्या गुन्ह्याचे तपास करून न्यायालयासमोर सादर करण्याकामी तत्परता दाखविण्याची आवश्यकता असल्याचे मार्गदर्शन पोलादपूर पोलिसांना केले.

याप्रसंगी पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी पोलादपूर पोलीस ठाण्याच्या आवारामध्ये वृक्षारोपण करून प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याच्या नावाने एक झाड लावल्यास पोलिसांच्या सेवाकाळाची आठवण कायम स्वरूपी पोलादपूरकरांना पोलीस ठाण्यात आल्यावर राहिल, अशी सूचना केल्यानुसार त्यांच्या उपस्थितीतच पोलादपूर पोलिसांनी केलेल्या वृक्षारोपणानंतर प्रत्येक झाडाला प्रत्येक पोलिसाचे नाव देण्यात आले.

सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी महाड एमआयडीसीतून अंमली पदार्थाचा साठा तसेच बेवारस मृतदेह सापडल्यानंतर खुनाचा तपास यशस्वीपणे केल्यानंतर पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांनी सहायक पोलीस निरिक्षक रावडे यांचा अलिबाग येथील पोलीस मुख्यालयामध्ये सत्कार केला होता.

# आरक्षणाच्या लढ्याला खांदा कॉलनीकरांची मोठी साथ



**| पनवेल | वार्ताहर |**

सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी तर्फे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान, मुंबई येथे सुरू झालेल्या ऐतिहासिक आंदोलनासाठी महाराष्ट्रभरातून आलेल्या विविध जिल्ह्यातील मराठा बांधवांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था खांदा कॉलनीतील आगरी शाळेत करण्यात आली होती.

आरक्षणाचा लढा यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याबद्दल आणि आंदोलन संपन्न झाल्याबद्दल सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी तर्फे आंदोलनात सहभागी झालेल्या महाराष्ट्रभरातून विविध जिल्ह्यातून आलेल्या सर्व मराठा समाज बांधवांचे पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रभरातून विविध जिल्ह्यातून आलेल्या समाज बांधवांच्या सेवेसाठी आगरी शिक्षण संस्थेच्या शाळेत केलेल्या व्यवस्था, सेवा व त्याग याबद्दल समाज बांधवांच्या वतीने सकल मराठा समाज मंडळाचे सल्लागार मार्गदर्शक रामचंद्र ढोबळे, शिवाजीशेठ दांगट, ओंकारशेठ गावडे, उपाध्यक्ष शिवाजी थोरवे आणि अहोरात्र मेहनत घेणारे सर्व पदाधिकारी व मंडळाचे सदस्य बांधव यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# खोपोली येथील सफाई कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा

**। खोपोली । प्रतिनिधी।**

खोपोली शहरात शास्त्री नगरमधील इतराज कुटुंबाने नेहरू गार्डनमध्ये गणेशमूर्तीचे कृत्रिम तलावात विसर्जन करुन निर्माल्य तेथील कलशात समर्पित केले. विसर्जनानंतर ते आपल्या घरी गेले, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, त्यांनी श्रीगणेशाच्या गळ्यात घातलेली २० ग्रॅमची सोनसाखळी निर्माल्यासोबत गेली. त्यानंतर त्यांनी तातडीने विसर्जन स्थळी जाऊन तेथे उपस्थित खोपोली नगरपालिकेचे आरोग्य विभागाचे मुकादम मंगेश चंदर वाणी यांना ही बाब सांगितली. त्यांनी सफाई कर्मचारी सुनील धाकू गायकवाड यांच्याकरवी निर्माल्य कलशातल्या पिशव्यांची तपासणी करून त्यात भूलचुकीने हारासोबत गेलेली सोनसाखळी शोधून इतराज कुटुंबाच्या हवाली केली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. विलास गजानन पवार, २) किरण गजानन पवार, ३) विद्या दत्तात्रेय शिंदे, ४) सुलभा चंद्रकांत पवार, ५) दिपक चंद्रकांत पवार, ६) ज्योती दिनकर शेलार, ७) संध्या उदय खोचरे व ८) प्रकाश चंद्रकांत पवार यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| किहीम | ३५६ | ०-५८-५० | ५.८३ |
| | | पो.ख. ०-११-८० | |
| | | ०-७०-३० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ५/९/२०२५

सही/-
**ॲड.गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला, 'श्रुतीसारंग' को. ऑप. हा.सोसायटी, युनियन बँकेसमोर
ब्राम्हणआळी, अलिबाग रायगड ४०२ २०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे बलिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रूपये | पैसे |
| रूपेश चंद्रकांत भुसाळ | ४७ | १/अ/५ | २-४४-०० | २ | ५५ |
| पैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र हे.आर.पॉ. ०-८२-०० इतके मात्र | | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
सही/-
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०५/०९/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल :- adv.jayeshmhase@gmail.com

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे टेंभरे, ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| सीमा मोहन शेट्टी | ६३ | १ | ०-२८-८ | ०.६९ |
| मोहन नारायण शेट्टी | ६३ | २ | ०-२६-६ | ०.७५ |

तरी वरील जमिन मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा.प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात

पत्ता : प्रशासकीय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१

**जाहीर नोटीस**

३२ ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/०९-२०२५

१. श्री. गोपाळ नारायण घोडविंदे — अर्जदार
रा. मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड
विरूद्ध
श्री.गजानन देव, वहिवाटदार
१. श्री. भास्कर दत्तात्रेय जोशी
२. श्री. पुंडलिक विनायक जोशी — सामनेवाले
३. श्री. श्रीपाद लक्ष्मण जोशी
रा. मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे-मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड या जमीन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक २९/५/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक १५/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमीन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं./गट नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|---|
| कर्जत | मांडवणे | १०१ | १ | १.१४.८० | १२.७२ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : २८/८/२०२५

सही/-
**तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण कर्जत**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे कै. प्रभाकर हरिश्चंद्र परकर, कै. मधुकर हरिश्चंद्र परकर, श्री. किशोर हरिश्चंद्र परकर, कै. रचना हरिश्चंद्र परकर, श्रीमती करूणा अरूण परकर, कै. सुजाता अनंत जावकर यांची सामाईक मालकीची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग जि. रायगड | १३७६ | ०१-०१-९० | १०.१७ |

सदर मिळकतीचे ७/१२ सदरी श्री. नंदु नथु नाईक, श्रीमती संगीता गणेश नाईक, श्री. अमित गणेश नाईक, श्री. प्रशांत गणेश नाईक यांची नावे कूळ म्हणून दाखल असल्याने त्यांनी आमचे विरूद्ध तहसिलदार अलिबाग येथे कुळ कायद्यातील तरतुदी अंतर्गत मिळकतींची किंमत ठरविण्याकरीता जमीन मालक कै. प्रभाकर हरिश्चंद्र परकर, कै. मधुकर हरिश्चंद्र परकर, श्री. किशोर हरिश्चंद्र परकर, कै. रचना हरिश्चंद्र परकर, श्रीमती करूणा अरूण परकर, कै. सुजाता अनंत जावकर यांचे विरूद्ध अर्ज दाखल केला. सदरचे कामात कै. प्रभाकर हरिश्चंद्र परकर, कै. मधुकर हरिश्चंद्र परकर, कै. रचना हरिश्चंद्र परकर, कै. सुजाता अनंत बावकर हे पूर्वीपासून मयत आहेत. ही बाब श्री नंदू नथु नाईक तसेच श्री. किशोर हरिश्चंद्र परकर यांना माहिती आहे. परंतु सदरचे कामात मयतांचे कोणीही वारस रेकॉर्डवर न घेताच सदरचे काम बेकायदेशीरपणे चालवून मयता विरूद्ध आदेश पारीत करून घेतला आहे. अशाप्रकारे सदर मिळकतींवर श्री नंदु नथु नाईक वै. यांनी लबाडीने नावे दाखल केल्यानंतर सदरची मिळकत त्रयस्थ ईसमांस विक्री करण्याचे ठरविले आहे. याकरीता श्री. नंदू नथु नाईक वै. यांनी सदर मिळकतींची विक्री परवानगी देखील घेतली आहे.

वास्तविक सदर मिळकत ही आमची सामाईक मिळकत आहे. श्री नंदु नथु नाईक यांनी जाणीवपूर्वक सदर मिळकतीचे मयत कायदेशीर वारसांना या कामात आवश्यक पक्षकार केलेले नाही. सदरील मिळकतींचे आम्ही देखील कायदेशीर वारस असल्याने सदर मिळकतींवर आमचा देखील कायदेशीर हक्क आहे. सबब सदरचे कामात तहसिलदार यांचेकडील आदेश आमचेवर बंधनकारक नाही. याकरीता आम्ही सदर आदेशाविरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई सुरु केली आहे. तसेच श्री. नंदु नथु नाईक वै. यांनी आमची व न्यायालयाची फसवणूक केल्याने त्यांचेवर देखील योग्य तो फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू केली आहे.

सदर मिळकतीबाबत श्री. नंदु नथु नाईक, श्रीमती संगीता गणेश नाईक, श्री. अमित गणेश नाईक, श्री. प्रशांत गणेश नाईक यांनी घेतलेला आदेश हा मयतांविरूद्ध असल्याने मुळातच चुकीचा व बेकायदेशीर असल्याने श्री नंदु नथु नाईक यांना सदर मिळकतींबाबत कोणताही कायदेशीर हक्क प्राप्त झालेला नाही. सबब श्री नंदु नथु नाईक वै. यांचेबरोबर सदर मिळकतीबाबत साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, दान, लिज, लिन, कर्ज अशा स्वरूपाचा कोणीही कोणताही व्यवहार करू नये. अशाप्रकारे सदर मिळकती संदर्भात असा कोणताही व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

हे आपणांस कळविले.

अलिबाग
दिनांक

**श्री. जिवेश गजानन परकर**
रा. ३०१, योगेश को.ऑ.हौ.सो.
मनिषा नगर, गेट नं. ०१,
कळवा प. ठाणे ४०० ६०५

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद केलेली मौजे चोंढी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक श्री.जगन्नाथ सत्यावान आंब्रे, रा. चोंढी, ता.अलिबाग, जि.रायगड सदरी यांच्या नांवे असून सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा त्यांना आहे. परंतु सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दंगदावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण गहाण इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत द्यावेत. सदर नोटीसी बाबत मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चोंढी, ता.अलिबाग | ४२/१ | क्षेत्र ०-६९-३०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-७०-८० | ७.७५ |

दिनांक :- ०४/०९/२०२५

सही/-
**ॲड. विश्वनाथ डी.भगत**
साईलिला अपार्टमेंट, दुसरा मजला,
फ्लॅट नं.३, श्रीबाग नं.२, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्याविविधजाहिरातींचीशहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ नारळ गोठे पाहिजेत-७०६६१३८३६८ ✻ इलेक्ट्रिशन पाहिजे-७०६६१३८३६८

■ *PHARMACIST REQUIRED*
अलिबागमध्ये कामाला फार्मसिस्ट पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा - ९३७०६५३०५८

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.रूपेश नारायण पवार यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे जमिन मिळकत धारकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे दहिगांव, तालुका सुधागड, जिल्हा रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (पोटखराब्यासह) हे.आर.पॉ. | आकार रू पैसे |
|---|---|---|---|
| १९७ | १/२ | १-०५-००<br>पो.ख. ०-१५-००<br>एकूण १.२०.०० | ०.४० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या ७/१२ वर श्री.सतीश गणपत मोहिते यांच्या नांवाची नोंद आहे आणि त्यांनी सदर मिळकत विक्री करण्याचे ठरविले आहे, तरी सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षिस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यु अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तिने वर नमुद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांपर्यत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०९/२०२५

**ॲड. संपदा एस. शहासने**
(ॲडव्होकेट)
पत्ता झिनत कॉर्नर, खोपोली, ता.खालापूर,
जि.रायगड-४१०२०३, मोबा. ७३८७२२७३२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक १) श्री. जगदीश वामनराव जाधव २) सौ.प्रिती जगदीश जाधव यांच्या कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:- मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे वैजनाथ | ५५ | १/अ/५ | ०-२०-०० | ०-८० |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चाॅज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०५/०९/२०२५

**खरेदीदारा तर्फे वकील**
**सही /-**
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
**पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड**
**मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७**

## ग्रुप ग्रामपंचायत सारळ

पो.सारळ ता.अलिबाग जि.रायगड ४०२२०९

ग्रुप ग्रामपंचायत सारळ, हदीत १५ वित्त आयोग योजनेअंतर्गत खालील कामांसाठी इच्छुक ठेकेदार यांचेकडून मोहोरबंद लिफाफा पद्धतीने दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निधिचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा सादर अंतिम |
|---|---|---|---|---|
| १. | उपकेंद्रात सौरऊर्जा संच बसविणे | १५ वित्त अबंधित | ५००००/- | दि.१०/०९/२०२५ सायंकाळी ०४.०० वा. पर्यंत |
| २ | ग्रामपंचायत हद्दीतील सर्व महसूल गावातील महिला व किशोर वयीन मुलींना सॅनिटरी प्याड | १५ वित्त अबंधित | ७६९७५/- | दि.१०/०१/२०२५ सायंकाळी ०४.०० वा. पर्यंत |
| ३ | सारळ आदिवासीवाडी समाजमंदिर रंगरंगोटी करून उपयोगी साहित्य देणे | १५ वित्त अबंधित | ३२०००/- | दि.१०/०९/२०२५ सायंकाळी ०४.०० वा.पर्यंत |
| ४. | सर्व महसूल गावातील अंतर्गत पाईप लाईन दुरुस्त करणे | १५ वित्त बंधित | २०००००/- | दि.१०/०९/२०२५ सायंकाळी ०४.०० वा.पर्यंत |

**अटी शर्ती :**
१.कामाची इसारा रक्कम १% राहील.
२.निविदा अर्जाची किंमत २००/- राहील.
३.कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५. ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीत जास्त १० टक्के कमी दराने निविदा भराव्यात. (कामाचा दर्जा चांगला राहावा याकरिता ग्रा.पं.ने तसा ठराव केला आहे.)
६. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराच्या एकापेक्षा जास्त निविदा आल्यास चिठ्ठी टाकून निर्णय घेण्यात येईल.
७. वरिल साहित्य खरेदी करणे वेगवेगळ्या निविदा मोहोरबंद लिफाफा पद्धतीने सादर कराव्यात.
८. निविदा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. १०/०९/२०२५ रोजी ठिक सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत निविदा प्राप्त होतील त्याच निविदा ग्राह्य धरण्यात येतील.
९. सदर विकास कामांकरिता निधी अंदाजपत्रका प्रमाणे अदा करण्यात येतील.
१०. प्राप्त निविदा दि. ११/०९/२०२५ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायतीत प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येतील. व त्यावेळी ठेकेदारांनी समक्ष उपस्थीत रहावे.

सही/-
**निशा उ.चंदनकर**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

**प्रशासक**
**श्री कैलास चौलकर**
**ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. : 7000037155**<br>**Tender No. : EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-25/ 2025-2026.**<br>RFx E-tender for Hiring of vehicle (Bolero/ Sumo/ Scorpio / Ertiga or equivalent)/ at 220kV Timbermart Substation under EHV (O&M) Division Panvel for F. Y. 2025-26....**2nd call.**<br>**Tender amount Rs. 3,80,901/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **04.09.2025, 18:00 Hrs. to 14.09.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 14.09.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **15.09.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer, E.H.V.(O&M) Dn. Panvel**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांचे मौजे वडघर, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील गट नं.२३९, एकूण क्षेत्र १-९८-०० पैकी क्षेत्र ०-७५-००, योग्य क्षेत्र ०-२२-००, पो.ख.०-५३-००, आकारणी (रू.पै.)०.१०, लागवड-आंबा/काजु ची मिळकत विद्यमान मालक १) अनंत सहदेव शेडगे यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची बोलणीसह सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमिन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधीत सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी मिळवून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लिज, बक्षीस, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरून कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यानी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरून आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि.०४/०९/२०२५

सही/-
**(ॲड.तानिया राजेंद्र गांधी)**
बी.कॉम.एल.एल.बी.
खरेदीदाराचे वकील

कार्यालयीन पत्ता
रा.महावीर मार्ग, छत्रपती शिवाजी
महाराज चौक ता.श्रीवर्धन, जि.रायगड

## जाहीर समन्स

दिवाणी अ ९ म — प्रो. ३०७
समन्स (दिवाणी व्यवहार
संहिता, नियमक्रम ५ नियम
१, ५) अनुसूची एक

**अलिबाग येथील मा.एस.एन.नाईक, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयांत**

नियमित दिवाणी दावा ४०/२००८
निशाणी क्र. २२३/ड

ने.ता.१६-०९-२०२५
श्री. रमेश हिरानंद कुंदनमल ...वादी
विरुद्ध
श्रीमती पार्वती शंकर म्हात्रे ... प्र. वादी
प्रति,
प्र.वादी २/३ - सौ. अर्चना आनंद म्हात्रे/श्रीमती अर्चना सुर्यकांत पाटील
५- श्रीमती कुसुम/आशा आत्माराम पाटील
७-श्रीमती लीलाबाई/वर्षा वसंत घरत
८-श्रीमती केसर/दर्शन दीनानाथ वाकडे
१०/२-सौ.निकिता संजय पाटील
१२-श्रीमती नंदा सुभाष म्हात्रे
१५-श्री. सुरेश हरिश्चंद्र म्हात्रे
रा.कोलगांव, ता.अलिबाग जि. रायगड

ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात वाद दाखल केला आहे.

त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १६-०९-२०२५ रोजी सकाळी १०-३० वाजता तुम्ही स्वत: किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर येऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काऊंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काऊंटर क्लेम) पुष्ट्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बचावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक २९-०८-२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर अलिबाग**

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर, अलिबाग-रायगड**

## जनसेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग

**२८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना**
**(फक्त सभासदांकरिता )**

स.न.वि.वि.

जनसेवा नागरी सहकारी पतसंस्थेच्या अधिमंडळाची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २०/०९/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता ''श्री विठोबा मंदिर देवस्थान ट्रस्ट'' च्या सभागृहात ''वरसोली'' ता. अलिबाग, येथे पतसंस्थेचे मा. अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित राहून सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१) दि.२८/०९/२०२४ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०२५ वर्ष अखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
३) सन २०२४-२०२५ च्या ताळेबंद, नफातोटा पत्रक या आर्थिक पत्रकांवर विचार करणे व स्विकृत करणे.
४) सन २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखापरिक्षकाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन स्विकृत करणे.
५) सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षकाच्या लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद करणे.
६) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी शासन नाम तालीकेवरील लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्याचे मानधन ठरविणे.
७) सन २०२५-२०२६ करिता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४ - २५ च्या नफा वाटणीस मंजुरी देऊन लाभांश जाहिर करणे.
९) सन २०२५-२०२६ च्या संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास व गतवर्षाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
१०) संचालक मंडळाने शिफारस केलेले सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणे.
११) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेऊन नोंद घेणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

दिनांक :- ०५/०९/२०२५
**अलिबाग.**

**संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**सौ. अमृता आ. पारसनीस**
**व्यवस्थापिका**
**जनसेवा नागरी सह. पत. मर्या.,अलिबाग**

**-: सभासदांना सूचना :-**

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सदर सभा त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांच्या माहितीसाठी वरील सभेच्या विषयी सर्व माहिती संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.
३) ज्या सभासदांना हिशोबाची पत्रके पहावयाची असतील त्यांना दि १५/०९/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते २.०० व दु. ३.०० ते ५.०० मध्ये दाखविली जातील.
४) ज्या सभासदांना हिशोबाचे पत्रकासंबंधी प्रश्न/सुचना/ठराव पाठवायचे असतील त्यांनी दिनांक १७/०९/२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात पाठवावेत. तोंडी प्रश्नांवर चर्चा करण्यात येणार नाही.
५) ज्या सभासदांच्या पाल्यांना सन २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेमध्ये ७० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत व पदवी परिक्षेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत आणि अहवाल सालात ज्या सभासदांच्या पाल्यांनी क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे अशा सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची एक सत्यप्रत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत दि. १५/०९/२०२५ पर्यंत आणून द्यावी. अशा पाल्यांना त्यांच्या पारितोषिकांची रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देऊन वार्षिक सभेत त्यांचा सन्मान करण्यात येईल.



# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५




● म्हसळा तालुक्यातील खरसई गावचे सामाजिक कार्यकर्ते निलेश परशुराम मांदाडकर यांच्या निवास्थानी स्थानापन्न करण्यात आलेल्या गणरायाच्या आकर्षक सजावट व देखाव्यात गणेश भक्तांना एकविरा मातेचे दर्शन घडले. (छायाचित्र- सलीम शेख, माणगाव)



● श्री.प्रशांत प्रभाकर पाटील व कुटूंबीय यांचे भोगेश्वर आळी, मुरूड ता.मुरूड जि.रायगड येथील निवासस्थानी विराजमान श्रीगणेश मूर्ती व श्री विठ्ठलावरील सुंदर देखावा.



● श्री. राजेंद्र रामचंद्र पाटील, दिवीपारंगी, अलिबाग, रायगड.



● चिरनेर येथील रंगकर्मी विजय गजानन पाटील यांच्या निवासस्थानात प्रतिष्ठापना करण्यात आलेली गणरायाची मूर्ती आणि आकर्षक आरास. (सजावटकार : अभय पाटील)



● अनिका अमोल पालकर (पो. रतवाड, ता. माणगाव, जि. रायगड) यांच्या घरी विराजमान झालेले बाप्पा एलोरा आणि एलंफटा (छायाचित्र : मुस्कान खान)




● संकेत साईनाथ घरत आणि संतोष घरत (शिर्डी द्वारकामाई देखावा) मु. थळ-पालथी



● श्री. एकनाथ दत्तात्रेय गुरव आणि सर्व परिवार. मुक्काम पोस्ट झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड



● मुरूड कोळीवाड्यातील निखिल कमलाकांत नायसाठे तसेच आई एकविरा मातेचा चलचित्र देखावा (छायाचित्र : सुधीर नाझरे)



● कुरुळ येथील माजी जिल्हा सरकारी वकील श्री प्रसाद पाटील आपल्या घरच्या गणरायासह. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● कुरुळ येथील स्व. चितांमण कानू पाटील परिवारातील वामन द्वादशी (७५) पंचाहत्तरावा गणपती उत्सव २०२५ साजरा करतानाची. (छायाचित्र- सुरेश खडपे)




● प्रणिता प्रल्हाद म्हात्रे (कोप्रोली)



● सौ. भावना प्रकाश पाटील चौल सागमळा यांनी साकारलेली गणरायाची मनमोहक सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● श्री. विवेक वसंत लोहार नागडोंगरी अलिबाग यांनी साकारलेली श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● उरण तालुक्यातील चिरनेर येथील प्रसिद्ध सजावटकार निलेश लक्ष्मण ठाकूर यांनी आपल्या चिरनेर मुळपाडा येथील निवासस्थानात गणेशोत्सवानिमित्ताने आपल्या कल्पकतेतून नेत्रसुख देणाऱ्या एका मंदिराची प्रतिकृती साकारली आहे. (सजावटकार निलेश ठाकूर व संकेत ठाकूर)



● श्री बाळकृष्ण बामा दरणे थेरोंडा डोऱ्याची वाडी यांचे निवासी श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)

# माणगावात वाहतूक कोंडीचे विघ्न कायम!

## मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक निर्विघ्न, यंदा एकही अपघात नाही

**। माणगाव । वार्ताहर ।**

कोकणातील दिड आणि पाच दिवसांच्या गणपतींचे आगमन होऊन विसर्जनही सुरळीत पार पडले. मुंबईहून कोकणात येताना आणि जाताना गणेश भक्तांना काही ठिकाणी खड्ड्यांचा सामना करावा लागला. मात्र वाहतूक सुरळीत सुरू असल्याने सुदैवाने एकही अपघाताची नोंद झालेली दिसत नाही.



महामार्गावर वाहतूक निर्विघ्न होत असताना माणगावमध्ये मात्र वाहतूक कोंडीचे विघ्न कायम आडवे येत आहे. मुंबईला ये-जा करताना माणगाव येथील वाहतूक कोंडीने गणेशभक्त तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

गणेशोत्सवाच्या आगमनापूर्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंह भोसले यांनी मुंबई गोवा महामार्गावरील खड्ड्यांचा पनवेल ते महाड असा पाहणी दौरा केला होता. त्या दौऱ्यात कॉन्ट्रॅक्टर आणि प्रशासनाला धारेवर धरले होते. महामार्गावर भरपावसात दिवस रात्र खड्डे बुजविण्यासाठी कार्यवाही सुरू झाली. पनवेल ते माणगाव या ९० किमी अंतरात पाच ठिकाणी एकाचवेळी खड्डे भरण्यासाठी काम सुरू झाले. बहुतांश ठिकाणी खड्डे आधुनिक तंत्रज्ञानाने भरले. त्यामुळे गणेश भक्तांनी समाधान व्यक्त केले. इंदापूर, माणगाव आणि लोणेरे येथे वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक पोलीस, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवक ठिकठिकाणी तैनात करण्यात आले. मात्र माणगाव शहरातील महामार्गाचे रुंदीकरण झालेले नाही, इंदापूर आणि माणगाव या बायपासचे काम रखडले आहे. इंदापूर, माणगाव आणि लोणेरे या २० किमी अंतरात सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे.

त्यामुळे वाहनांच्या २ ते ३ किमीच्या रांगा लागल्या होत्या. माणगावच्या काळनदीवरील नवीन पुलाचे काम कासवगतीने सुरू आहे. त्याचे काम पावसाळ्यात थांबले आहे. त्यामुळे काळ नदी पुलावरून एकेरी वाहतूक होत असल्याने संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे वाहनांच्या रांगा दिसत असतात.

या मार्गावर सुमारे १५० ते २०० स्वयंसेवक, वाहतूक पोलीस, पोलिस मित्र पोलीसांच्या हाकेला धावून आले. त्यांनी वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली. ठिकठिकाणी तात्पुरती प्रवाशांच्या सेवेसाठी पोलीस मदत केंद्र उभारण्यात आले आहेत. अशी सर्व प्रकारची सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्याने सुदैवाने गेल्या १५ दिवसांत एकही अपघात झाला नाही.

यावेळीही वाहनचालकांना पर्यायी मार्गांची व्यवस्था करण्यात आली आहे. खोपोली, पाली, निजामपूर मार्गे माणगाव, खरवली फाटा, गांगवली, पाचाड, पुणे असे विविध मार्ग कोकणात जाण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे माणगाव वगळता वाहतूक सुरळीत होण्यासाठी मदत झाली आहे.

# हाणामारीत ५ जण जखमी

**पनवेल :** पिकअप टेम्पोने दुसऱ्या वाहनाला धडक दिली. त्यातून निर्माण झालेल्या वादात झालेल्या मारहाणीत पाच जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी मारहाण करणाऱ्या ८ ते १० जणांविरोधात गुन्हा दाखल करून त्यापैकी पाच आरोपींना अटक केली आहे. मराठा समाज आंदोलनात सहभागी होण्यासाठी आंबेगाव तालुक्यातील काही मराठा बांधव पिकअप वाहनाने जुन्या मुंबई-पुणे मार्गाने येत असताना मराठा बांधवांची पिकअप पनवेलमधील डेरवली पुलाजवळ आली असताना रहदारीच्या ओघात लाल रंगाच्या कारला धडकली. यावरून कारचालक आणि मराठा बांधवांमध्ये वाद होऊन भांडण झाले.

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांचे शर्थीचे प्रयत्न

**। कोलाड । वार्ताहर।**

मुंबई-गोवा मार्गावरुन बाप्पाचे विसर्जन करून कोकणवासी परतीच्या मार्गाला लागले आहेत. कोकणवासियांच्या वाहनांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रायगड पोलिसांकडून शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत.

गणेशोत्सव हा सण मोठ्या आनंदात साजरा करून कोकणवासी परतीच्या प्रवासाला लागले आहेत परंतु माणगाव, इंदापूर, कोलाड, खांब येथे वाहन चालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला परंतु रायगड पोलिसांनी वाहतूक कोंडी नियंत्रणात आणली.

सात दिवसाच्या बाप्पांचे विसर्जन करून कोकणातील कोकणवाशी मुंबई, पुणे, सुरत व देशाच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी कोकणवासी परतीच्या प्रवासाला निघाले आहेत परंतु मुंबई-गोवा हायवे वरील अपूर्ण काम व रस्त्यात असणारे खड्डे यामुळे या महामार्गांवरील खांब, कोलाड, इंदापूर, माणगाव येथील सिंगल रस्त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

कोकणवासियांचा परतीचा प्रवास सुखकर व्हावा व येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी ठिकठिकाणी रायगड पोलिसांनी ठिकठिकाणी कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर ठेवण्यात आली आहे.